दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २४४ I बुधवार १७ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग ८५

### परमेश्वर प्राप्ती...

परमेश्वराने ही सृष्टी रचली. आपल्याला माहीतच आहे, इथे पुष्कळ विद्वान लोक आहेत, की कशी पृथ्वीची रचना ओंकारापासून झाली आणि किती त्याच्यावर परमेश्वरानी मेहनत घेतली आहे. त्यापुढे त्या पृथ्वीवर वनस्पती, त्यानंतर अनेक प्राणी निर्माण करून त्यांची हजारो वर्षे जोपासना केली. त्या जोपासनेतून हळूहळू त्यांची निवड करून त्यांना या अशा स्थितीला आणून पोहोचवलंय जिथे आपण त्या प्राण्यांना मात करून आज मानव प्राणी तयार केलेला पहातो आहोत आपल्याला कळलंच पाहिजे की त्या अमीबापासून मनुष्य का झाला आणि हे समजलं पाहिजे की जो परमेश्वर, ज्याने आपल्याला बनवलेले आहे, ज्याने सर्व सृष्टी रचलेली आहे, तो कोण आहे ? कसा आहे? परमेश्वराने सृष्टी घडवली, मानव घडवला की मानवाने परमेश्वराला जाणलं पाहिजे आणि ही साधी गोष्ट आहे. तुम्हाला मुलगा होतो, अशा प्रेमळ पित्यापासून तुम्हाला जे काही मिळालेलं आहे ते तुम्ही अजून जाणलेलं नाही. ते तुम्हाला माहीत नाही. म्हणून त्याच्या अनेक तऱ्हा निघालेल्या आहेत. आता आमचा जन्म आम्ही महाराष्ट्रात का घेतला? महाराष्ट्र खरंच जसं नाव आहे तसाच महा+राष्ट्र आहे. ही संतांची भूमी आहे. हा परत एक इतिहास आहे. संतांनी या भूमीला सुंदर केलेलं आहे. आपल्या भक्तींनी, तुमचे धर्म सांभाळलेत, तुमचं पावित्र्य सांभाळलंय त्यांनी. हे कशासाठी ? रात्रंदिवस आपण यज्ञ करतो, पाठ करतो, मंदिरात जातो, चर्चमध्ये जातो, नमाज पढतो, ते कशासाठी ? करण्यासाठी म्हणून नाही तर काही तरी त्याचा हेतू पुढचा आहे. तो जो हेतू आहे तो आत्मज्ञानाचा आहे. आम्ही आपल्या आत्म्याला जाणलं पाहिजे, आत्म्याला ओळखलं पाहिजे ही त्याच्यामध्ये ओढ आहे म्हणून आपण हे सगळे करतो.खर तर म्हणजे जोपर्यंत आपण आपल्या आत्म्याला ओळखत नाही तोपर्यंत परमेश्वराच्या नावाने आपण काही जरी केलं तरी ते परमेश्वराला पोहोचत नाही. २५ फेब्रुवारी १९७९ पुणे

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## भरझोपेत कुऱ्हाडीचा हल्ला : पतीचा मृत्यू, पत्नीची मृत्यूशी झुंज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** काम करून संसाराचा गाडा ओढणारे एक कुटुंब मध्यरात्री शांत झोपेत असताना काळाने त्यांच्या आयुष्यावर घाला घातला. शहरातील कल्याण रोड परिसरातील जाधव मळा येथे अज्ञात हल्लेखोराने भरझोपेत असलेल्या दाम्पत्यावर कुऱ्हाडीने हल्ला केल्याने पतीचा जागीच मृत्यू झाला, तर पत्नी गंभीर जखमी होऊन मृत्यूशी झुंज देत आहे.

शेवगाव तालुक्यातील काळेगाव येथील मूळ रहिवासी असलेले लक्ष्मण उर्फ लक्ष मार्तंड काळे (३०) आणि त्यांची पत्नी रूपाली काळे (२८) हे रोजगारासाठी नगरमध्ये वास्तव्यास होते. पत्र्याच्या शेडबाहेर उघड्यावर झोपलेल्या या दाम्पत्याच्या आयुष्यात मंगळवारी पहाटे तीनच्या सुमारास भीषण घटना घडली. अज्ञात व्यक्तीने कुऱ्हाडीने लक्ष्मण काळे यांच्यावर सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या लक्ष्मण यांचा जागीच मृत्यू झाला. पतीवर हल्ला होत असताना मदतीसाठी धावलेल्या रूपाली यांच्यावरही हल्लेखोराने वार केले. त्यांच्या तोंडावर गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. श्वानपथक, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि ठसे पथकाच्या मदतीने तपास सुरू करण्यात आला असून हल्ल्यात वापरलेली कुऱ्हाड जप्त करण्यात आली आहे. एका क्षणात संसार उद्ध्वस्त करणाऱ्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून अज्ञात हल्लेखोराचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत.


# जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत वाढ

## स्थानिक स्वराज्य संस्था विजयी उमेदवारांना दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्याचसोबत नागपूर येथील महत्त्वाकांक्षी वैद्यकीय प्रकल्पापासून ते ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणासाठीच्या नवीन धोरणांपर्यंत अनेक मोठे निर्णय मंगळवारी घेण्यात आले.

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या विविध विभागांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. आजचे निर्णय हे प्रामुख्याने ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य सुविधेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढवणे यावर केंद्रित आहेत.



**■ तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी चालना देत मानव विरहित यंत्रणा धोरण जाहीर करण्यात आले आहे. हवाई, सागरी तसेच जमिनीवरील कृषी व इतर क्षेत्रांतील अवघड आणि जोखमीच्या कामांसाठी ड्रोन आणि विविध रोबोट्सची निर्मिती या धोरणांतर्गत केली जाईल. या क्षेत्रात संशोधन, विकास आणि मनुष्यबळ प्रशिक्षणाला विशेष प्रोत्साहन दिले जाणार आहे.**

वैद्यकीय उपचारांमध्ये अधिक अचूकता आणण्यासाठी नागपूर येथे हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प उभारणीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मध्य भारतातील हा एकमेव आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून विविध गंभीर रोगांचे आणि आजारांचे वेळेत व अचूक निदान करणे शक्य होणार असल्याने, सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्यातील ग्रामीण भागात भेडसावणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नवीन धोरण जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत ग्रामीण पेयजल योजनांचा शाश्वत विकास करण्यावर भर दिला जाईल. विविध पाणी योजनांचे एकत्रिकरण करून, ग्रामीण जनतेला स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पाणीपुरवठा व्हावा यासाठी दीर्घकालीन नियोजन केले जाणार आहे. राज्यात 'अमेंडेड भारत नेट कार्यक्रम' अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी सुधारित पद्धतीला मंजुरी देण्यात **(पान ४ वर)**

## दीड वर्षांच्या चिमुकल्यासह मातेची आत्महत्या



### कोळेवाडीतील काळीज पिळवटून टाकणारी शोकांतिका





**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील कोळेवाडी येथे घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. एका ३१ वर्षीय विवाहितेने आपल्या दीड वर्षांच्या चिमुकल्या मुलाला गळफास देऊन त्यानंतर स्वतःही आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आशा सूर्यभान आंबेकर (वय ३१) यांनी आपल्या शिवांश (वय दीड वर्षे) या मुलासह राहत्या घरात दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. चिमुकल्या शिवांशचे निरागस आयुष्य आणि आईचे असे अकाली जाणे पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

**■ गावातील अनेकांच्या मते, आशा आंबेकर या स्वभावाने शांत होत्या. त्यामुळे त्यांनी एवढा टोकाचा निर्णय का घेतला, याबाबत सर्वांनाच आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेषतः निष्पाप शिवांशचा या दुर्दैवी घटनेत गेलेला जीव अनेकांना अस्वस्थ करून गेला आहे.**

घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीस कॉन्स्टेबल रामनाथ सानप यांनीही घटनास्थळी पाहणी केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले. पथकाने घटनास्थळावरील पुरावे संकलित करण्याचे काम हाती घेतले.

कौटुंबिक वादाची पार्श्वभूमी असल्याची माहिती तपासादरम्यान समोर आली आहे. आशा आंबेकर या वारंवार वेगळे राहण्याचा आग्रह धरत होत्या. तसेच कंपनीत नोकरी **(पान ४ वर)**

### महत्त्वाचे..

**पांढऱ्या पट्ट्यांच्या वादाचे राजकारण नको : ललित गांधी**



मुंबई : जैन समाजाच्या धार्मिक स्थानी अथवा सोसायटीमध्ये मारलेल्या पांढऱ्या पट्ट्यावरून सुरू झालेला वाद हा निरर्थक व अनाठायी असून, शांतताप्रिय, अहिंसावादी जैन समाजाला लक्ष्य करून महाराष्ट्राला बदनाम करण्याचे षडयंत्र असल्याची शंका उपस्थित करतानाच या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी अशी मागणी अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्राला उच्चतम सांस्कृतिक मुल्यांची हजारो वर्षांची परंपरा आहे. शब्दशः हजारो वर्षापासुन महाराष्ट्राचा अविभाज्य घटक असलेल्या जैन समाजाला जाणीवपुर्वक बदनाम करून महाराष्ट्राची सांस्कृतिक वीण बिघडविण्याचे हे षडयंत्र आहे. या प्रकारच्या विषयातुन धार्मिक-सामाजिक तेढ निर्माण करून वेगाने विकसित होत असलेल्या महाराष्ट्र व मुंबईला विकासात मागे ठेवण्याचा हा प्रयत्न असुन या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणीही गांधी यांनी केली आहे.

## नियमांना हरताळ फासून आदिवासी शिक्षक भरती..?

### 'पवित्र' उल्लंघन : चौकशीची मागणी आणि तीव्र आंदोलनाचा इशारा

**डॉ. सतीश खर्डे । राष्ट्र सह्याद्री**

आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

**नाशिक :** आदिवासी विकास विभागातील शिक्षक भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप समोर आल्याने नाशिक विभागात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात अपर आयुक्त दिनकर पावरा यांच्यावर थेट आरोप करण्यात आले असून, त्यांच्यावर कठोर कारवाई करून सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी बहुजन क्रांती सेनेने केली आहे. तसेच या संपूर्ण भरती प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शासनाने आदिवासी आश्रम शाळांमधील शिक्षक भरती केवळ 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमातून करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र या आदेशांचे उल्लंघन करून काही पदांची भरती नियमबाह्य पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत संबंधितांकडून आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.





तक्रारीनुसार, ११ जून २०२५ रोजी नाशिक विभागाकडून माध्यमिक शिक्षण सेवक व प्राथमिक शिक्षकांच्या पदभरतीसंदर्भात प्रस्ताव तयार करण्यात आला. त्यानंतर ३१ जुलै २०२५ रोजी आणखी एका प्रस्तावाद्वारे प्राथमिक शिक्षक, शिक्षण सेवक, पुरुष अधीक्षक व महिला अधीक्षिका अशा विविध पदांच्या नियुक्ती प्रक्रिया राबविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, काही पदांसाठी आवश्यक मान्यता नसताना भरती प्रक्रियेला परवानगी देण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेत **(पान ४ वर)**

**बेमुदत उपोषणाचा इशारा**

दरम्यान, या प्रकरणाची दखल घेऊन तातडीने कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषण छेडण्याचा इशारा तक्रारदारांनी दिला आहे. नाशिक येथील महसूल आयुक्त कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. १५ दिवसांच्या आत शासनाने योग्य ती कार्यवाही न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. उपोषणादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

## शिंगवेतुकाई : कृषी विभागाची धडक कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील शिंगवेतुकाई एम.आय.डी.सी. परिसरातील एका खत कंपनीवर कृषी विभागाने संचालक निविष्ठ व गुणनियंत्रण सुनील बोरकर , विभागीय कृषी सहसंचालक पुणे बाबासाहेब जेजुरकर, मुख्य गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक प्रवीण देशमुख व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अहिल्यानगर सुधाकर बोराळे यांच्या मार्गदर्शन खाली धडक छापा टाकून तब्बल २१ लाख ८० हजार ४८६ रुपये किमतीचा बेकायदेशीर खत साठा जप्त केला आहेत.

**२१.८० लाखांचा रासायनिक खतांचा साठा जप्त**

स्वतःचा परवाना असताना देखील वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांच्या नावाचा गैरवापर करून, बनावट **(पान ४ वर)**



## खा. वाकचौरे शिंदे शिवसेनेत जाणार का?

### ■ ठाकरे गटातील ७ खासदारांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चेत भाऊसाहेब वाकचौरे यांचे नाव अग्रभागी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई/शिर्डी :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय भूकंपाची चर्चा सुरू झाली असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सात खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या संपर्कात असल्याचा दावा समोर आला आहे. या पार्श्वभूमीवर शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे देखील शिंदे गटात जाणार का, याबाबत अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात उत्सुकता आणि चर्चांना उधाण आले आहे.

शिंदे गटाचे नेते कृपाल तुमाने यांनी ऑपरेशन टायगर अंतिम टप्प्यात असल्याचा दावा करत ठाकरे गटातील सात खासदार संपर्कात असल्याचे म्हटले आहे. या दाव्यानंतर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विशेष म्हणजे, शिर्डी लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाच्या तिकिटावर विजयी झालेले भाऊसाहेब वाकचौरे हे गेल्या काही दिवसांपासून विविध राजकीय चर्चांच्या केंद्रस्थानी आहेत.या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर पक्षाच्या सर्व खासदारांची तातडीची बैठक बोलावली होती. पक्षाकडून सर्व **(पान ४ वर)**

# ज्ञानराधा पतसंस्था घोटाळा : सुरेश कुटेसह सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडी

## सुनावणी वेळी श्रीरामपूर न्यायालय परिसरात ठेवीदारांची अभूतपूर्व गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : बहुचर्चित ज्ञानराधा पतसंस्था घोटाळा प्रकरणातील सर्व आरोपींना सोमवारी श्रीरामपूर येथील न्यायालयात कडक पोलीस बंदोबस्तात हजर करण्यात आले. सात दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर पोलिसांनी आरोपींना पुढील न्यायालयीन कोठडी देण्याची मागणी केली. त्यानुसार न्यायालयाने सर्व आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावून त्यांची बीड येथील कारागृहात रवानगी करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणातील मुख्य आरोपी सुरेश कुटे व इतर आरोपींना न्यायालय क्रमांक १ मध्ये न्यायाधीश साळवे यांच्या समोर हजर करण्यात आले. सुनावणीपूर्वी ठेवीदारांच्या वतीने ॲड. संदीप कुलकर्णी यांनी प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे व महत्त्वाची माहिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

सुनावणीदरम्यान सुरेश कुटे यांनी स्वतःकडे मोठ्या प्रमाणात मालमत्ता असून ठेवीदारांचे पैसे परत करण्याची तयारी असल्याचे सांगितले. तसेच विविध प्रकरणांचे एकत्रीकरण करण्यासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केल्याचा दावा केला. मात्र, ॲड. संदीप कुलकर्णी यांनी या दाव्यांचा पुराव्यानिशी प्रतिवाद करत संबंधित कथन वस्तुस्थितीला धरून नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. ठेवीदारांनी कुटे यांना पैसे परत करण्यासाठी तब्बल एक वर्षाची मुदत दिली होती, मात्र त्या कालावधीतही त्यांनी ठेवीदारांचे पैसे परत केले नाहीत, असेही न्यायालयासमोर मांडण्यात आले.



**४८ ठेवीदारांच्या आत्महत्यांना जबाबदार कोण..?**

**ठेवीदारांच्या वतीने विश्वनाथ आवटी यांनी न्यायालयात भूमिका मांडताना, पतसंस्थेच्या गैरव्यवस्थापनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून ४८ ठेवीदारांनी आत्महत्या केल्याचे सांगितले जाते. याची जबाबदारी कोणाची? असा सवाल उपस्थित केला.**

दरम्यान, सुनावणीसाठी न्यायालय परिसरात ठेवीदारांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्तासह एसआरपीएफची मदतही घ्यावी लागल्याची माहिती सूत्रांनी दिली. या वेळी तपास पथकातील अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते. याच वेळी आंबेजोगाई येथील ठेवीदार कृती समितीचे प्रमुख लक्ष्मणराव गोरे यांच्यावर झालेल्या कथित हल्ल्याचा निषेधही ठेवीदारांनी व्यक्त केला. प्रकरणात सरकारी पक्षाची बाजू सरकारी वकील ॲड. प्रसन्न गटणे यांनी मांडली. दरम्यान, तपासादरम्यान फॉरेन्सिक अहवाल, बँक व्यवहारांची माहिती व इतर आर्थिक कागदपत्रे प्राप्त होण्याची अपेक्षा असून त्याआधारे पुढील कायदेशीर लढा अधिक बळकट केला जाणार असल्याचे ठेवीदारांच्या प्रतिनिधींनी सांगितले.

ज्ञानराधा पतसंस्था घोटाळ्यातील तपासाला वेग आला असून पुढील सुनावण्यांकडे ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी की रोजगाराचे महाभारत?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

जगातील प्रत्येक औद्योगिक क्रांतीने मानवजातीला नवी दिशा दिली, परंतु त्याचबरोबर काही जुन्या व्यवस्था मोडूनही काढल्या. वाफेच्या इंजिनापासून संगणकापर्यंत आणि इंटरनेटपासून डिजिटल युगापर्यंत प्रत्येक बदलाने रोजगार, उद्योग आणि अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले. आता जग एका नव्या क्रांतीच्या उंबरठ्यावर उभे आहे. ती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय). सिलिकॉन व्हॅलीतील नामांकित गुंतवणूकदार विनोद खोसला यांनी भारतीय आयटी सेवा उद्योग भविष्यात इतिहासजमा होऊ शकतो, असा दिलेला इशारा केवळ एका उद्योगापुरता मर्यादित नसून संपूर्ण रोजगार व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा मानावी लागेल.

आज भारताचा माहिती तंत्रज्ञान उद्योग सुमारे ३०० अब्ज डॉलर्सच्या महसुलाच्या उंबरठ्यावर आहे. देशातील सुमारे ६० लाख लोकांना या क्षेत्रातून थेट रोजगार मिळतो. कोडिंग, सॉफ्टवेअर टेस्टिंग, ग्राहक सेवा, डेटा प्रक्रिया, बॅकएंड ऑपरेशन्स आणि व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापन या कामांवर भारताने जगभरात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. अमेरिकेसह अनेक विकसित देशांनी कमी खर्च आणि कुशल मनुष्यबळामुळे भारताला जगाचे 'बॅक ऑफिस' बनवले. मात्र आता एआयच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे हीच ताकद कमकुवत होण्याची भीती निर्माण झाली आहे.

आजचे एआय मॉडेल काही सेकंदांत हजारो ओळींचा संगणकीय कोड लिहू शकतात. सॉफ्टवेअरमधील त्रुटी शोधू शकतात. ग्राहकांच्या प्रश्नांना मानवी कर्मचाऱ्यांइतकेच नव्हे तर त्यांच्यापेक्षाही वेगाने उत्तर देऊ शकतात. अनेक कंपन्यांनी ग्राहक सेवा केंद्रांमध्ये मानवी कर्मचाऱ्यांऐवजी एआय चॅटबॉट्सचा वापर सुरू केला आहे. परिणामी पारंपरिक आयटी आणि बीपीओ क्षेत्रातील लाखो नोकऱ्या पुढील दशकात धोक्यात येऊ शकतात.

मात्र हा प्रश्न केवळ आयटी उद्योगापुरता मर्यादित नाही. एआयचा प्रभाव पत्रकारिता, शिक्षण, आरोग्य, बँकिंग, कायदा, शेती, उत्पादन उद्योग आणि सार्वजनिक प्रशासन अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रावर पडणार आहे. वृत्तपत्र क्षेत्रात एआय आधीच बातम्या लिहिणे, भाषांतर करणे आणि छायाचित्रे तयार करणे यासारखी कामे करत आहे. त्यामुळे पारंपरिक पत्रकारितेच्या पद्धतींना आव्हान निर्माण झाले आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षकांची भूमिका बदलणार असून माहिती देणाऱ्या शिक्षकांऐवजी मार्गदर्शक शिक्षकांची गरज निर्माण होईल. बँकिंग क्षेत्रात कर्ज मंजुरी, जोखीम विश्लेषण आणि ग्राहक सेवा ही कामे मोठ्या प्रमाणात स्वयंचलित होतील. आरोग्य क्षेत्रात निदान आणि उपचार नियोजनासाठी एआयचा वापर वाढेल.

यामुळे सर्वात मोठे आव्हान रोजगाराचे निर्माण होणार आहे. इतिहास सांगतो की प्रत्येक तांत्रिक क्रांतीने काही नोकऱ्या संपवल्या, परंतु नवीन संधीही निर्माण केल्या. मात्र एआयची गती इतकी प्रचंड आहे की नव्या संधी निर्माण होण्यापूर्वी मोठ्या प्रमाणात रोजगार कमी होण्याचा धोका आहे. विशेषतः मध्यम कौशल्य असलेल्या कर्मचाऱ्यांवर त्याचा सर्वाधिक परिणाम होईल. केवळ पदवी घेऊन नोकरी मिळविण्याचा काळ आता संपत चालला आहे. सतत नवे कौशल्य आत्मसात करणे हीच भविष्यातील रोजगाराची गुरुकिल्ली ठरणार आहे.

याच ठिकाणी भारतासाठी मोठी संधीही दडलेली आहे. भारताकडे जगातील सर्वात मोठ्या युवा लोकसंख्येपैकी एक आहे. अभियांत्रिकी, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील लाखो विद्यार्थी दरवर्षी शिक्षण पूर्ण करतात. जर हे मनुष्यबळ केवळ आउटसोर्सिंगपुरते मर्यादित न राहता एआय विकसित करणे, डेटा विज्ञान, रोबोटिक्स, सायबर सुरक्षा आणि डिजिटल नवकल्पना याकडे वळले, तर भारत जगातील पुढील तांत्रिक महासत्ता बनू शकतो.

सरकार, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यासमोर आता मोठी जबाबदारी आहे. शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करून विद्यार्थ्यांना भविष्यातील कौशल्ये शिकवावी लागतील. उद्योगांनी कर्मचाऱ्यांचे पुनर्प्रशिक्षण करावे लागेल. सरकारने संशोधन आणि नवोन्मेषासाठी मोठी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. अन्यथा जग एआयच्या नव्या अर्थव्यवस्थेकडे झेपावत असताना भारत जुन्या मॉडेलमध्ये अडकून राहण्याचा धोका आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही शत्रू नाही; परंतु तिच्याकडे दुर्लक्ष करणे हा सर्वात मोठा धोका आहे. प्रत्येक क्रांतीप्रमाणे ही क्रांतीही विजेते आणि पराभूत निर्माण करेल. प्रश्न एवढाच आहे की भारत या बदलाचा नेतृत्व करणारा देश ठरणार की बदलाच्या लाटेत वाहून जाणारा? आज घेतलेले निर्णयच त्या प्रश्नाचे उत्तर ठरवतील.

## २१ जून पासून राज्यात मोसमी पावसाला सुरुवात

# या वर्षी दुष्काळ नाही : पंजाबराव डख

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**चांदा** : यावर्षी पाऊस लेट झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत तर अनेक शेतकरी पावसासाठी देवाला साकडे घालत आहेत.

परंतु या वर्षी दुष्काळ काही पडणार नाही २१ जून ते ३० जून पर्यंत राज्यात मोसमी पाऊस पडणार आहे असे हवामान तज्ञ पंजाबराव डख यांनी वडाळा बहिरबा येथे सोनालीका ट्रॅक्टर च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यात बोलताना व्यक्त केले .

ते पुढे म्हणाले की मी जानेवारी महिन्यातच सांगितले होते की यावर्षी पाऊस थोडा उशिरा पडणार आहे शेतकऱ्यांनी घाबरून जायचं काही एक कारण नाही तसेच १० जुलै ते १५ जुलै पुन्हा पाऊस पडणार आहे ऑगस्टमध्ये कमी पाऊस राहणार आहे सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये पाऊस पुन्हा धुमाकूळ घालणार आहे असे त्यांनी सांगताच उपस्थित शेतकऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना दाद दिली तसेच दहा वर्षात पडणाऱ्या पावसाचा देखील त्यांनी अंदाज या वेळेस उपस्थित शेतकऱ्यांना दिला



हवामान तज्ञ पंजाबराव डख सोनालिका ट्रॅक्टर्सच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यात उपस्थित शेतकऱ्यांना आगामी होणाऱ्या पावसा बद्दल माहिती देताना
( छाया, देविदास चौरे )

या कार्यक्रमासाठी बाळासाहेब गर्जे, हरपाल सिंग, गणेश शेलार, अजहर शेख, किरण नागरे, संदीप शिर्के, संदीप राऊत, निलेश भांडवलकर हे सोनालिका कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते या वेळेस सोनालिका ट्रॅक्टर बद्दल उपस्थित शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हेमंत मगर यांनी केले तर सूत्रसंचालन गणेश महाराज चौधरी यांनी केले उपस्थित शेतकऱ्यांचे आभार लक्ष्मी ट्रॅक्टर्स चे भाऊसाहेब ठोंबरे यांनी मांनले

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मी ट्रॅक्टर्सच्या सर्व टीमने विशेष परिश्रम घेतले

# आ. लंघे यांच्याकडून पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचा सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा पोलीस स्टेशनचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी पदाची सूत्रे हाती घेताच आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन सन्मान केला.नेवासा येथील जनसंपर्क कार्यालयात हा सन्मान करण्यात आला. हा सन्मान केवळ औपचारिक नसून कायदा व सुव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वयाचे प्रतीक ठरला.

यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या नेवासा तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षमपणे राखण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळावा, त्यांच्या समस्या तातडीने सोडविल्या जाव्यात आणि पोलीस प्रशासनाबद्दल जनतेचा विश्वास अधिक दृढ व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांची कार्यशैली, शिस्तप्रियता आणि कर्तव्यनिष्ठा याबाबत पोलीस विभागात चांगली ओळख आहे. दुसरीकडे आमदार विठ्ठलराव लंघे हे जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळे या दोन कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्त्वांचा समन्वय नेवासा तालुक्याच्या विकासासाठी आणि सुरक्षिततेसाठी निश्चितच सकारात्मक परिणाम घडविणारा ठरेल, अशी सर्वसामान्य जनतेची अपेक्षा आहे.

# ७.५ कोटी निधीच्या शेत पाणंद रस्त्यांच्या कामाला मान्यता : आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : – मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेतून बारमाही, मजबूत रस्त्यांचे बांधकाम करून पेरणी, मशागत,कापणी आणि शेतमाल वाहतुकीस गती देण्यासाठी कोपरगाव मतदार संघातील शेतकऱ्यांच्या रस्त्याच्या अडचणी सोडविण्यासाठी निधी मिळावा यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी महायुती शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यातून कोपरगाव मतदार संघातील ७.५ कोटी निधीच्या शेत पाणंद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

ग्रामीण भागातील नागरीकांना शेत,पाणंद रस्त्यांची वाढती गरज लक्षात घेवून व शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी व भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय म्हणून महायुती शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेतून जास्तीत जास्त लोकवस्ती असलेल्या रस्त्यांच्या कामांना गती देण्यासाठी जास्तीत जास्त निधी कसा मिळविता येईल यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्याला मिळालेल्या यशामुळे मतदार संघाच्या अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेत-पाणंद रस्त्यांच्या अडचणी कायमच्या दूर होणार आहेत.



पावसाळ्यात चिखल व साचलेल्या पाण्यामुळे रस्ते बंद राहतात त्यामुळे बैलगाडी, ट्रॅक्टर देखील शेतात जावू शकत नाही. पेरणी आणि कापणीच्या वेळी जर अशी परिस्थिती असेल तर शेतकऱ्यांच्या अडचणीत अधिकच वाढतात. याची दखल घेवून महायुती शासनाने शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना सुरु केली आहे. पाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना शेतात सुलभपणे ये-जा करता येणार आहे. तसेच पेरणी आणि काढणीच्या हंगामात शेती मालाची वाहतूक अडचण कमी होवून शेतमाल बाजारात पोहचवण्यासाठीचा खर्च निश्चितपणे कमी होणार असून तातडीने बाजारपेठेशी संपर्क होण्यास मोठी मदत होणार आहे. चिखल,पावसाळा किंवा खराब रस्त्यांच्या समस्यांपासून शेतकऱ्यांची कायमची सुटका होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीव्यवस्थेला मोठा आधार मिळणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे. महायुती शासनाने कोपरगाव मतदार संघातील ७.५ कोटी निधीच्या शेत पाणंद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल आ. आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री नएकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे यांचे आभार मानले आहे.

# डॉ. नामदेव फटांगरे 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील पोखरी बाळेश्वर येथील सुपुत्र तथा पुणे येथील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीआयटी) या महा विद्यालयाचे क्रीडा आणि शारीरिक शिक्षण संचालक डॉ. नामदेव फटांगरे यांना 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच मुंबई येथील बी दि चेंज फाउंडेशन यांच्यावतीने सुमित रेवरी, रुक्मिणी गलांडे, अभिनेत्री निवेदिता पगार, अमृत रोहोम तसेच बी दि चेंज फाउंडेशनचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे यांच्या हस्ते देऊन सन्मानित केले.



देशभरातील विविध राज्यांमधील गुणी,कर्तव्यनिष्ठ,समाजाभिमुखतसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांचा यावेळी गौरव करण्यात आला. पुणे जिल्ह्या तून राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारा साठी निवड होणे ही डॉ. फटांगरे यांच्यासाठी तसेच संगमनेर तालुक्या साठी अभिमानाची बाब ठरली आहे.

पुणे येथे राष्ट्रभक्ती परिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. फटांगरे यांना क्रीडा, आरोग्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्या बद्दल 'भारत आदर्श गौरव' हा राज्य स्तरीय पुरस्कारही प्रदान करण्यात आला होता. योग, क्रीडा आणि शारीरिक शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान, तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधना तील सक्रिय सहभाग याची दखल घेऊन त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर विशेष उल्लेखनीय मानले जाते.

# डेंग्यू-मलेरिया रोखण्यासाठी तातडीने फवारणी करा : इम्तियाज अत्तार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : – आगामी पावसाळ्याच्या धर्तीवर आणि शहरातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सोमवार (दि.१५) रोजी पार पडलेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या सभागृहात आरोग्य समितीच्या आढावा बैठकीत आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी विविध सूचना मांडल्या.



येत्या काही दिवसात पावसाळा सुरु होत असल्यामुळे शहरात डासांमुळे पसरणाऱ्या डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची दाट शक्यता आहे. यामुळे शहरातील सर्वच प्रभागांमधील कचरा वेळेवर उचलून प्रभाग स्वच्छ ठेवून शहरात नियमितपणे डास प्रतिबंधक औषध फवारणी तसेच धूर फवारणी करावी. शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाचे उद्घाटन होवून बराच कालावधी उलटला आहे तरी हि हे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यात आलेले नाही. तरी तातडीने हे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यात यावे. तसेच संपूर्ण शहरात अनेक जुनी झाडे असून उन्हाची दाहकता वाढत असल्याने लांबलेल्या पावसाची वाट न पाहता या झाडांना नियमित पाणी देण्याची सोय करणे अत्यंत गरजेचे आहे.

शहरातील सार्वजनिक शौचालयांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून अनेक शौचालयांमध्ये पाणी नाही तर काही शौचालयांची दारे तुटलेल्या स्थितीत असल्याने नागरिकांची विशेष करून महिलांची गैरसोय होत आहे. यामुळे शहरातील सर्व शौचालयांची दुरुस्ती आणि पाण्याची सुविधा करून नियमित स्वच्छ करण्यासाठी विशेष यंत्रणा तयार करावी. जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही. पालिका सत्ताधारी आणि प्रशासनाकडून नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. यामुळे सुचवलेल्या आणि ठरलेल्या सर्व उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी सुरू करावी. अशा विविध प्रकारच्या नागरिकांच्या हिताच्या सूचना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी आरोग्य समितीच्या आढावा बैठकीत मांडल्या.

# एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी सुचना करण्याचे आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : राज्यातील एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी महिला संदर्भात काम करणाऱ्या सामाजिक संघटनांकडून सूचना व अभिप्राय उद्या दि.१८ जून रोजी मागविण्यात येत आहेत. जिल्हा परिषद कार्यालयात संबंधित संस्था,संघटना व व्यक्तींनी उपस्थित राहून आपल्या सूचना,अभिप्राय द्यावेत, असे आवाहन साऊ एकल महिला समितीचे निमंत्रक हेरंब कुलकर्णी, स्नेहालयचे डॉ.गिरीश कुलकर्णी व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी केले आहे.

राज्यात एकल महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने साऊ एकल महिला समितीच्या मागणीवरून राज्य शासन एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण करणार आहे.एकल महिला धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख व वास्तवाधिष्ठित करण्याच्या उद्देशाने नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, तज्ज्ञ व्यक्ती तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय व सूचना जाणून घेण्यासाठी दि.१८ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद,अहिल्यानगर येथे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे.

तरी दि.१८ रोजी कार्यशाळेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या सूचना व अभिप्राय नोंदवावेत, असे आवाहन जिल्हा समन्वयक प्रतिमा कुलकर्णी, मिलिंद साळवे, अशोक कुटे, कारभारी गरड, संगीता मालकर,मुकुंद टंकसाळे, प्रकाश जोंधळे, बाळासाहेब जपे,आप्पासाहेब ढूस, शिवाजी घाडगे ,प्रकाश इथापे, किसन आव्हाड, रेणुका चौधरी,ऊज्वला शेळके, तारामती दिवटे, प्रथमेश सोनवणे, सचिन साळुंके यांनी केले आहे.

# ऊस पिकावरील हुमणी नियंत्रणासाठी जैविक उपाययोजनांना प्राधान्य द्या : डॉ.वर्पे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : ऊस पिकामध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या हुमणी अळीमुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी हुमणी अळीचे वेळेत नियंत्रण करून एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रवरा कृषी महाविद्यालयाचे डॉ. सुदाम वर्पे यांनी केले.



पद्मभूषण लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असलेल्या लोणी येथील कृषी महाविद्यालयाच्या वतीने आश्वी खुर्द येथे 'ऊस पिकावरील हुमणी किडीचे व्यवस्थापन' या विषयावर शेतकरी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. वर्पे म्हणाले की, हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी जैविक तसेच रासायनिक उपाययोजना उपलब्ध असल्या तरी जैविक घटकांचा अधिकाधिक वापर करून पर्यावरणपूरक शेतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. जैवविविधतेचे संवर्धन आणि उत्पादन खर्चात बचत यासाठी शास्त्रशुद्ध व्यवस्थापन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

चर्चासत्रात डॉ. रमेश जाधव यांनी खरीप हंगामातील विविध पिकांचे उत्पादन तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण तसेच बीजप्रक्रियेचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. बदलत्या हवामान परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतकऱ्यांनी उत्पादन वाढीसाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. सुष्मिता विखे पाटील आणि कृषी संचालक प्रा. डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास आश्वी खुर्द सोसायटीचे चेअरमन विजय भोसले, संचालक विठ्ठल आप्पा गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य संजय भोसले, दूध संस्था सदस्य निलेश भवर यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य प्रा. अमोल खडके, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदूत देवेंद्र शिंदे, ओंकार शिंदे, सोहम शिंदे, अनिकेत चोरमले, बाळासाहेब जवरे, ओंकार रोमन, पवन मोरे, विनायक कदम, शुभम शेटे व शुभम ठवरे यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन विठ्ठल आप्पा गायकवाड यांनी केले.

# ना. विखे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील सावळीविहीर बुद्रुक येथे राज्याचे जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून व गावातील विविध शाळांतील गरजू विद्यार्थ्यांना वह्या व शालेय वस्तू वाटप करत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोर सावळीविहीर बुद्रुक येथील सरपंच ओमेश जपे, सरपंच महासंघाचे राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब जनार्दन जपे, आदींच्या मार्गदर्शनाखाली येथे ग्रामपंचायत सोसायटी तसेच विविध संस्थांचे आजी, माजी पदाधिकारी, युवक कार्यकर्ते, ग्रामस्थ या सर्वांच्या वतीने येथे एकत्र येऊन नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचा जयजयकार करत एकमेकांना पेढे भरवत हा वाढदिवस साजरा केला.



तत्पूर्वी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आवाहन केल्याप्रमाणे ग्रामस्थ व ग्रामपंचायत तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने सावळीविहीर बुद्रुक गावातील सर्व अंगणवाड्या तसेच हायस्कूल, प्राथमिक शाळा, येथील विद्यार्थ्यांना आज शाळेचा पहिला दिवस असल्याने व नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त केळी बिस्किटे, चॉकलेट वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, आदी शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच ओमेश जपे यांनी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायतीच्या वतीने शुभेच्छा दिल्या. यावेळी भाऊसाहेब चौधरी ,संजय मातेरे,सोपान जपे, राजेंद्र साळवे, कोठारी परिवार, ज्ञानेश्वर जपे सर, सतीश जपे ,सुनील वाघमारे, राजेंद्र व सागर कुदळे, आदी देणगीदारांचे आभार मानले. सामाजिक कार्यकर्ते रमेश कसबे यांनीही यावेळी नामदार विखे पाटील यांनी कार्यकर्त्यांना आपला वाढदिवस विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके वाटून साजरा करण्याचे केलेले आवाहन खरंच मोठे स्तुत्य असल्याचे व नामदार विखे पाटील हे गरिबांचा दाता असल्याचे यावेळी सांगितले.

यावेळी ना. राधाकृष्ण विखे पा. यांना दीर्घायुष्य लाभो यासाठी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी मनोमन प्रार्थना करत एकमेकांना पेढे भरवत वाढदिवसानिमित्त आनंद उत्सव साजरा केला. व ना.विखे पाटलांचा विजय असो, त्यांना दीर्घ आयुष्य मिळो, एकच साहेब विखे साहेब अशा कार्यकर्त्यांनी घोषणाही यावेळी दिल्या.या कार्यक्रमाला उपसरपंच विकास जपे, कृ. उ. बा. समितीचे संचालक शांताराम जपे , गणेश कापसे, संतोष आगलावे, स्वप्निल पारडे, संजय जपे, आनंद जपे, सोपान पवार, राहुल आगलावे, राजू कापसे, राजेंद्र आसराज आगलावे, पत्रकार राजेंद्र गडकरी, निलेश आरणे, रामदास आगलावे, संजय वाघमारे, विक्रम आगलावे, कैलास पळसे ,सतीश वाघमारे, विनायक वाघमारे , राधु जाधव, सागर मनतोडे, आदींसह सर्व संस्थांचे आजी माजी पदाधिकारी ,कार्यकर्ते, ग्रामस्थ,यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## जिल्हा परिषद शाळाच घडविते उद्याचे अधिकारी : प्रांताधिकारी सावंत

**श्रीरामपूर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अशोकनगर येथे सोमवारी शाळा प्रवेशोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना सावंत म्हणाले, ज्या जिल्हा परिषद शाळेने आपल्याला घडविले, शिक्षणाची भक्कम पायाभरणी केली आणि अधिकारी बनण्याचे स्वप्न दाखविले, त्या शाळेचे आपण काहीतरी देणे लागतो. जिल्हा परिषद शाळा उद्याचे अधिकारी, प्रशासकीय अधिकारी आणि जबाबदार नागरिक घडविणाऱ्या संस्था असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विविध स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रांताधिकारी पाटील यांचा सत्कार करण्यात आला. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वितरित करण्यात आले. मराठी शाळांबद्दलची आत्मीयता व्यक्त करताना पाटील यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. तसेच शाळेच्या विकासासाठी रोख पाच हजार रुपयांची मदत जाहीर केली. कार्यक्रमास पालक, ग्रामस्थ, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि विद्यापीठाच्या ट्रायकोडर्मा निर्मिती कंटेनरला पेटंट

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि संशोधन केंद्र, कुंदेवाडी, ता. निफाड, जि. नाशिक येथील वनस्पती रोगशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक (रोगशास्त्रज्ञ) डॉ. पोपट खंडागळे यांनी स्ट्रॉबेरीच्या प्लेटप्रमाणे जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा तयार करण्यासाठी रचना प्रारूप तयार केले आहे. त्यास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने मान्यता दिली आहे. व्यापारी तत्त्वावर ट्रायकोडर्मा तयार करण्यासाठी काचेच्या बाटल्या प्रत्येक वेळेस निर्जंतुक कराव्या लागतात. परंतु या कंटेनरमध्ये त्याची गरज नाही. प्लेट फक्त बाह्य निर्जंतुकीकरणावर देखील बुरशीची योग्य वाढ होते. यासाठी वारंवार निर्जंतुकीकरणाची गरज नसल्याने वीज बिलाची तसेच मानवी श्रमाची बचत होते. हे कंटेनर स्वस्त, रिसायकलेबल, प्रदूषण विरहित व उपलब्ध सोपे आहे. हे कंटेनर तयार करण्यासाठी वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. टी. गायकवाड, गहू विशेषज्ञ डॉ. बी. एम. म्हस्के, डॉ. एस. बी. गावडे, डॉ. एन. एम. मगर, डी. बी. पाटील, डॉ. पी. बी. खैरे व डॉ. एच. आर. कुमावत यांचे सहकार्य लाभले.

## कोल्हार येथे अक्कलकोट स्वामी समर्थांच्या पादुकांचे भक्तिभावाने स्वागत



**कोल्हार** : संपूर्ण महाराष्ट्रभर सुमारे आठ हजार किलोमीटरची परिक्रमा करत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रासादिक पादुका सोमवारी सकाळी श्रीक्षेत्र कोल्हार येथे दाखल झाल्या. यावेळी स्वामीभक्त सोमवंशी परिवार व ग्रामस्थांच्या वतीने उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.

# रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध द्या : आ. काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी** : कोपरगाव सनियंत्र सल्लागार समितीची बैठक नुकतीच आमदार आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या बैठकीत रुग्णालयातील आरोग्य सेवा, उपलब्ध सुविधा तसेच रुग्णांना मिळणाऱ्या उपचारांच्या गुणवत्तेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी रुग्णालय प्रशासनाला रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, आवश्यक औषधे व वैद्यकीय सुविधा उपलब्ध असाव्यात तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.तसेच रुग्णालयातील स्वच्छता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाय योजना तातडीने राबविण्याच्या सूचना केल्या. सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य सेवांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी रुग्णालय सनियंत्र सल्लागार समितीच्या सदस्यांसमवेत २८.८४ कोटी निधीतून सुरु असलेल्या १०० बेडच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला. उपजिल्हा रुग्णालयाच्या कामासाठी अधिकच्या निधीची गरज पडल्यास निधी मिळवून देणार असल्याचे सांगत लवकरच हे काम पूर्ण होऊन सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय रुग्णांच्या सेवेत दाखल होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, गट विकास अधिकारी संदीप दळवी, आरोग्य अधिकारी डॉ. गिरीश गुट्टे, डॉ.कृष्णा फुलसुंदर, डॉ.उंबरकर, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य डॉ.अजय गर्जे, सार्वजनिक बांधकाम उपभियांता वर्षराज शिंदे, पशु संवर्धन अधिकारी श्रीमती काटे, नगरसेवक इम्तियाज अत्तार, सौ. कविता नाईकवाडे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, डॉ. आतिश काळे, डॉ. तुषार गलांडे, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, हाजीमेहमूद सय्यद, विजय त्रिभुवन, वाल्मिक लहिरे, शैलेश साबळे, सोमेश आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, रमेश गवळी, बाळासाहेब आढाव, अजीज शेख, फकीर कुरेशी, दिनकर खरे, सचिन ठोळे, नवाज कुरेशी, शुभम काळे, मनोज नरोडे, धनंजय कहार, सागर फडे, मुकुंद भूतडा, नितेश बोरुडे, सागर आहेर, संतोष मरसाळे, अशोक आव्हाटे, सचिन परदेशी, मुकुंद इंगळे, जावेद शेख, भाऊसाहेब भाबड, चंद्रकांत धोत्रे, राजेंद्र आभाळे, राजेंद्र खैरनार, संतोष दळवी, विकी चांदर, तन्मय साबळे, वैभव कानडे, हारुन शेख, फैय्याज, मयुरेश शिंदे, मयुर राऊत, बाबासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

## इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांची जि.प. शाळा सहकार वस्तीला पसंती; प्रवेशोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : आयएसओ मानांकन प्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सहकार वस्ती (तांभेरे) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे बैलगाडीतून मिरवणूक काढून अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. अण्णासाहेब मुसमाडे यांनी उपलब्ध करून दिलेली बैलगाडी फुगे व नारळाच्या झावळ्यांनी सजविण्यात आली होती. बैलपोळ्याप्रमाणे सजवलेल्या बैलांसह विद्यार्थ्यांची संपूर्ण वस्तीतून मिरवणूक काढण्यात आली.

यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मुख्याध्यापक संतोष डगळे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेताना मागील वर्षीची २० असलेली पटसंख्या यावर्षी २४ वर पोहोचल्याचे सांगितले. शाळेतील विविध उपक्रम व विद्यार्थ्यांच्या यशामुळे इंग्रजी माध्यमातील पाच विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. धोंडेश्वरी उद्योग समूहाचे प्रमुख जगताप तात्या यांनी दिलेल्या उच्च प्रतीच्या इन्व्हर्टरचे लोकार्पण करण्यात आले. शाळेच्या परसबागेतील आंब्यांपासून तयार केलेल्या आमरस पार्टीचेही आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास योगेश खाटेकर, संदीप अंत्रे, अनिल शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक विजय शिंदे यांनी आभार मानले.

## अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने ना.विखे यांचा वाढदिवस उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी** : येथील मुस्लीम समाज बांधव व अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने ना .राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आल्याची माहिती ना विखे खंदे समर्थक हाजी गफ्फारखान पठाण यांनी दिली आहे. याप्रसंगी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा चे जिल्हाध्यक्ष रऊफ शेख हेही यावेळी उपस्थित होते . यावेळी उर्दू हायस्कूल येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तर ना विखे यांना दीर्घायुष्यासाठी साईबाबा आणि हाजी अब्दुल बाबा समाधीवर चादर चढवत प्रार्थना करण्यात आली.

याप्रसंगी मुस्लिम समाजातील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते . यावेळी गफ्फारखान म्हणाले की, नामदार राधाकृष्ण विखे यांचा वाढदिवस आमचे हातून साजरा होणे हे आमचे आम्ही भाग्य समजतो. ना. विखे यांचा राज्यातील राजकारणात धबधबा असून शिर्डी विधानसभा मतदारसंघाला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. त्यांचं कर्तुत्व संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे शिर्डी विधानसभा मतदारसंघात विमानतळ, रेल्वे, स्टेशन बॉम्बचा दारूगोळा कारखाना असे अनेक मोठमोठे प्रकल्प त्यांनी तडीस नेले आहे. त्यामुळे शिर्डी विधानसभा मतदार संघाची भरभराट झाली आहे. त्यांनी सुचवल्याप्रमाणे त्यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्याच्या आदेशाप्रमाणे शिर्डीत भरगच्च असे कार्यक्रम समाज बांधवांच्या वतीने साजरे करण्यात आले आहे.

# मुक्तांगण प्राथमिक शाळेत चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : मुक्तांगण प्राथमिक शाळा, राहुरी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. यावर्षी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन व खाऊ वाटप करून स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील पहिल्या दिवसाची आठवण जतन करण्यासाठी त्यांच्या पावलांचे ठसे कागदावर घेण्यात आले.

यानंतर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र विठ्ठल जाधव व शाळेचे मुख्याध्यापक भरत पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मसालेभात व जिलेबीचे भोजन देण्यात आले. यावेळी सोमनाथ मोरे, सौ. प्रियंका साळवे, सौ. तय्यबा सय्यद, सौ. मनीषा विधाटे, सौ. कल्पना साळवे, सौ. सपना साळवे, सौ. प्रीती विधाटे, सौ. आसमा सय्यद आदी पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक भरत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल काळे, नानासाहेब हापसे, सांगळे, सौ. मकासरे मॅडम, सौ. पलघडमल मॅडम तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागताने शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात झाली.

## विद्यालयांना देणगी देऊन आईच्या स्मृतीस मुलाकडून अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : मूळचे नेवासा बुद्रुकचे रहिवासी व हल्ली नेवासाफाटा येथे स्थायिक असलेले पोलीस अधिकारी संजयबाबा गायकवाड यांच्या आदर्श माता पुरस्कार प्राप्त मातोश्री श्रीमती छबुबाई किसन गायकवाड यांचे ७० व्या वर्षी अकस्मात निधन झाले.संजूबाबा गायकवाड यांनी शैक्षणिक बांधिलकी म्हणून जिल्हा परिषद शाळांना निधी देऊन खऱ्या अर्थाने आईच्या स्मृतीस अभिवादन केले.

आईच्या स्मृती प्रित्यर्थ संजयबाबा गायकवाड यांनी नेवासा बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,गंगापूर तालुक्यातील अंमळनेर वस्ती जिल्हा परिषद शाळा,नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथील श्री गाडगे महाराज आश्रम शाळा,मुकींदपूर जुने येथील जिल्हा परिषद मराठी शाळा या चार शाळांना प्रत्येकी दोन हजार रुपये देणगी श्रीमती छबुबाई किसन गायकवाड यांच्या दशक्रिया विधीच्या निमित्ताने दिले.या अभिनव उपक्रमाद्वारे पोलीस अधिकारी संजय बाबा गायकवाड यांनी विद्यालयांना देणगी देऊन खऱ्या अर्थाने आईच्या स्मृतीस अभिवादन केले आहे.

# दुष्काळ सदृश परिस्थितीत ऊस व केळी पिके घेऊ नका : डॉ. ढगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यामधील सौंदाळा येथे ग्रामपंचायत व सिंजेंटा कंपनी मार्फत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे यांनी दुष्काळ सदृश परिस्थितीत जास्त पाण्याची ऊस व केळी पिके घेऊ नका तर खरीप हंगामातील बाजरी पूर्व मका यांचे देशी वाण शेतकऱ्यांनी घ्यावीत असे आवाहन केले.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते बाबा आरगडे हे होते. डॉ. ढगे पुढे म्हणाले की महाराष्ट्र शासनाने प्रकल्प वर्षा हा कृत्रिम पावसाचा प्रयोग तातडीने हाती घ्यावा शेतकऱ्यांनी आपत्कालीन व्यवस्थापनामध्ये बाष्पविरोधक, रासायनिक खतांचा कमी वापर, जैविक सेंद्रिय खतांचा अधिक वापर, तरी आडसरी भिजविणे यासारख्या तंत्राचा वापर करावा व्हीएसआय पुणे संस्थेमधून सेवानिवृत्त झालेले ऊस विशेषज्ञ डॉक्टर रमेश हापसे यांनी ऊस उत्पादन वाढीच्या उभ्या पिकासंदर्भात सविस्तर तंत्रज्ञान सांगून मार्गदर्शन केले. सिंजेंटा कंपनीचे विभागीय व्यवस्थापक पवन थोरात यांनी हुमणी अळी बंदोबस्ताबाबत प्रकाश सापळा व इतर उपाययोजना सुचविल्या.मेळाव्याच्या नियोजनासाठी नामदेव गव्हाणे बबलू परसु वाले महेश नागवडे यांनी परिश्रम घेतले डॉ. ढगे पुढे म्हणाले की सौंदाळा येथे माणुसकीची भिंत, शिवी दिल्यास दंड, जात उच्चाटन यासारख्या उपक्रमातून या गावाची ओळख सामाजिक क्रांतीचे माहेर अशी झाली आहे. सरपंच शरद आरगडे यांनी उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले शेतकरी मेळाव्याला नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## उक्कलगाव येथे ना. विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वह्याचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उक्कलगाव व वाकण वस्ती येथे माजी खासदार सुजय विखे पाटील मित्र मंडळाच्या वतीने शाळेत विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. तालुक्यातील उक्कलगाव येथे राज्याचे जलसंपदा मंत्री व पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी जिल्हा परिषदेच्या शाळेत कार्यक्रम पार पडला.याप्रसंगी,अध्यक्ष ज्येष्ठ नेते किशोर थोरात यांच्या अध्यक्षतेखाली शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी नवागंताचे विद्यार्थ्यांचे स्वागत केले.गावातून प्रभात फेरी काढण्यात आली.यावेळी,श्रीरामपूर तालुका भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष अनिल थोरात, ग्रामपंचायत सदस्य शरद थोरात,बबन रजपूत,विजय तोरणे, शिवाजी बोर्डे, बाबासाहेब थोरात, बाबासाहेब मोरे,लक्ष्मण थोरात,पंडित जाधव, सोमनाथ मोरे सुरेश विश्राम थोरात रवींद्र किशोर थोरात, विजय पारखे, बाबासाहेब राजाराम थोरात, दिलीप पारखे, नितीन फुलपगार, संजय दरंदले, आदिनाथ जगधने, भानुदास थोरात, मनोज धनवटे, ईश्वर दरंदले, रोहिदास धनवटे, गणेश मोरे, सोमनाथ मंजाबापू मोरे, रावसाहेब शिंदे, अशोक थोरात, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक पालक विद्यार्थी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

**तमाम लोकांस या नोटीसव्दारे कळविण्यात येते की,**

मिळकतीचे वर्णनः मौजे जि. अहिल्यानगर ता. राहाता पैकी मौजे को-हाळे शिवारातील शेतजमीन

१. गट नं. - ९४६, क्षेत्र - ००.६०, आकार - ०१.१५
२. गट नं. - ९४६, क्षेत्र - ००.२२, आकार - ००.४०
३. गट नं. - ९४६, क्षेत्र - ००.२२, आकार - ००.४२

वर नमुद मिळकतीमध्ये आमचे अशीलांचा १. प्रिया निलेश परकाळे २. राजकृष्ण निलेश परकाळे ३. गौरी निलेश परकाळे अविभक्त हिस्सा असुन, सदर मिळकतीत आमचे अशीलांचा कायदेशीर हक्क व अधीकार आहे.

सदर मिळकतीचे आजपावेतो वाटप झालेले नाही. वाटप होवुन आमचे अशीलांस त्यांचा हिस्सा मिळणे आवश्यक आहे. त्याकारणे आमचे अशीलांनी राहाता येथील मे. सिव्हील जज्ज साहेब सि. डी. यांचे कोर्टात दिनांक ०८/०५/२०२६ रोजी AMH20230008025C202300036 जाहीर ठरावाचा, वाटपाचा, प्रत्यक्ष कब्जा व निरंतर ताकीद मनाई हुकमासाठी दावा दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्र.वादी नामे संगीता नानासाहेब परकाळे रा. को-हाळे ता. राहाता जि. अ.नगर यांचे नावे वडीलोपार्जीत अविभक्त हिस्सा असलेली वर नमुद मिळकती ७/१२ नाव आहे. याचा गैरफायदा घेवुन आमचे अशीलांचा अविभक्त हिस्सा डावलणे करीता नोटीस नमुद मिळकती विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहे. तरी ही नोटीस नमुद मिळकती संदर्भात दावा नमुद प्र.वादी संगीता नानासाहेब परकाळे गहाण, दान, करार, कर्ज, काही बोजा, विक्री हस्तांतरनाचे कोणतेही व्यवहार करण्यात येवु नये. केल्यास आमचे अशीलांचे हिस्यावर बंधनकारक राहाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे

हि जाहिर नोटीस असे.

**अशीलांतर्फे व करीता**
**ॲड.भास्करराव तुळशीराम पठारे**
**बी.ए.एलएल.बी.**
**ऑफिस : बाभळेश्वर, ता. राहाता, जि. अहमदनगर**

**नोटीस देणार**
**प्रिया निलेश परकाळे**

# पाणीप्रश्न व स्वच्छतेबाबत आपच्या उपोषणाची प्रशासनाकडून दखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : शहरातील पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या प्रश्नांवर आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष संदीप दिलीप आलवणे यांनी केलेल्या आमरण उपोषणाची दखल घेत नेवासा नगरपंचायतीने त्यांना लेखी उत्तर दिले आहे. शहरातील समस्या सोडविण्यासाठी विविध उपाययोजना सुरू असल्याचे सांगत प्रशासनाने उपोषण तात्काळ थांबविण्याचे आवाहन केले आहे. नगरपंचायतीने दिलेल्या पत्रानुसार, आलवणे यांनी ८ जून २०२६ रोजी दिलेल्या निवेदनाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. नेवासा शहरातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असून, पाणीपुरवठा योजनेशी संबंधित जॅकवेल आणि फिल्टर प्लांट येथे वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे अडचणी निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यासंदर्भात ११ जून २०२६ रोजी महावितरण अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून, पाणीपुरवठा सुरू असताना वीजपुरवठा खंडित होणार नाही यासाठी सूचना देण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे. तसेच नगरपंचायत व महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय



राहावा यासाठी स्वतंत्र व्हॉट्सॲप गटही तयार करण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. स्वच्छतेच्या प्रश्नावर नगरपंचायतीने मनुष्यबळाची कमतरता असल्याचे कारण दिले आहे. घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छतेसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र महाराष्ट्र द्विवार्षिक निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे त्यात विलंब झाल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

आता आचारसंहिता संपुष्टात आल्याने संबंधित प्रक्रिया सुरू करण्यात आली असून ठेकेदारालाही आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, नगरपंचायतीने आपल्या निवेदनाची दखल घेऊन आवश्यक उपाययोजना सुरू केल्याचा दावा करत संदीप आलवणे यांनी सुरू केलेले उपोषण तत्काळ थांबवावे, असे आवाहन केले आहे.

तसेच उपाययोजना सुरू असतानाही उपोषण कायम ठेवल्यास त्यातून उद्भवणाऱ्या परिणामांची जबाबदारी संबंधित आंदोलनकर्त्यांवर राहील, असेही नगरपंचायतीने आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे. नेवासा शहरातील पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या प्रश्नावर सुरू करण्यात आलेल्या उपोषणाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या आंदोलनास जनसेवक सतीश मुळे सर, नेवासा मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील,शिव सहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार अँड. संजय सुखदान,विठ्ठल मैदाड, काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल,नगरसेवक जालिंधर गवळी, ग्राहक मंचचे अतुल कुऱ्हाडे यांच्यासह अनेक नागरिकांनी पाठिंबा दर्शविला.

## पान १ वरुन

### शिंगवेतुकाई : कृषी विभागाची धडक कारवाई

गोण्यांमध्ये अनधिकृत खत साठवणूक आणि पॅकिंग करून शासनाची व शेतकऱ्यांची मोठी फसवणूक केल्याचे या कारवाईत उघडकीस आले आहे.याप्रकरणी कंपनीचे मालक किरण चंद्रकांत दौंडकर (रा. केडगाव, अहिल्यानगर) यांच्या विरोधात सोनई पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिंगवे तुकाई घोडेगाव एमआयडीसी येथील एका खत कंपनीवर कृषी विभाग व पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत विविध कंपन्यांच्या नावाने बनावट पद्धतीने रासायनिक खतांचे पॅकिंग व साठवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या कारवाईत २,०३४ गोण्या रासायनिक खतांचा सुमारे २१ लाख ८० हजार ४८६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून कंपनीचे मालक किरण चंद्रकांत दौंडकर याच्याविरूद्ध कृषी अधिकारी वाल्मिक एकनाथ सुडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई(दि.१५ ) जून रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान तसेच १६ जून रोजी पहाटे २.३० वाजेपर्यंत शिंगवे तुकाई येथे कंपनीच्या गोडाऊनवर कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान संबंधित कंपनीकडे स्वतःच्या नावाने खत उत्पादन व विक्रीचा परवाना असतानाही इतर विविध कंपन्यांच्या नावाने खतांचे उत्पादन, पॅकिंग व अनधिकृत साठवणूक केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले. कृषी विभागाने पंचांसमक्ष खतांचे नमुने घेऊन काही खतांच्या गोण्या जागेवरच सीलबंद केल्या, तर उर्वरित साठा जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या खतांमध्ये विविध कंपन्यांच्या नावाने तयार करण्यात आलेल्या एकूण २,०३४ गोण्या असून त्यांची अंदाजे किंमत ₹२१,८०,४८६ इतकी आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील बनावट खत व्यवसायावर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणी बी.एन.एस. कलम ३१८(४) तसेच रासायनिक खत (नियंत्रण) आदेश १९८५ मधील संबंधित तरतुदी आणि आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई कृषी विभागाच्या पथकाने सोनई पोलिसांच्या मदतीने केली. पुढील तपास पोलीस सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे हे करीत आहेत. या कारवाईमुळे बनावट किंवा अनधिकृत खत उत्पादन व विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच खतांची खरेदी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### नियमांना हरताळ फासून आदिवासी शिक्षक भरती..?

आर्थिक व्यवहार, संगनमत आणि अधिकारांचा गैरवापर झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून भरती प्रक्रिया राबविल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारदारांनी या प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. चौकशीत दोषी आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

शासनाच्या भूमिकेकडे लक्ष- आदिवासी विकास विभागातील शिक्षक भरती प्रक्रियेबाबत करण्यात आलेले आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याने आता शासन आणि आदिवासी विकास विभाग यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. भरती प्रक्रियेत खरोखरच नियमांचे उल्लंघन झाले आहे का, याचा उलगडा चौकशीनंतरच होणार असला तरी या आरोपांमुळे आदिवासी विकास विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### दीड वर्षांच्या चिमुकल्यासह मातेची आत्महत्या

करण्याची त्यांची इच्छा होती. याच कारणावरून पती-पत्नीमध्ये वारंवार वाद होत असल्याचे सांगितले जात आहे. मागील एक वर्ष त्या आपल्या आई-वडिलांकडे राहत होत्या. अवघ्या सहा दिवसांपूर्वीच त्या पुन्हा सासरी परतल्या होत्या. मात्र, इतक्या टोकाचे पाऊल उचलण्यामागे नेमके कारण काय, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. दरम्यान, दोन्ही मृतदेह रवी देवगिरे यांच्या रुग्णवाहिकेतून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. राहुरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून आत्महत्येमागील कारणांचा सखोल तपास सुरू आहे.

कोळेवाडीतील या घटनेने पुन्हा एकदा मानसिक तणाव, कौटुंबिक संवादाचा अभाव आणि सामाजिक आधारव्यवस्थेच्या गरजेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. एका आईने स्वतःसह आपल्या लेकराचाही जीवनप्रवास संपविल्याने संपूर्ण परिसर शोकमग्न झाला असून, या घटनेची चर्चा दिवसभर सुरू होती.

### जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत वाढ

आली आहे. हा कार्यक्रम गतीने पूर्ण करण्यासाठी महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या नावाने विशेष हेतू वहन यंत्रणा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'विकसित भारत – जी राम जी (व्ही बी जी राम जी) योजनेची' राज्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या विकसित भारत – जी राम जी कायदा, २०२५ शी सुसंगत अशा आवश्यक तरतुदी 'महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७' मध्ये केल्या जाणार असून, यासाठीचा अध्यादेश काढण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्याचबरोबर, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. अशा उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. यासाठी मुंबई महापालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम आणि नगरपरिषदा अधिनियमात आवश्यक सुधारणांना मंजुरी देण्यात आली.

### खा. वाकचौरे शिंदे शिवसेनेत जाणार का?

नऊ खासदार उपस्थित असल्याचा दावा करण्यात आला असला तरी काही खासदार ऑनलाइन सहभागी झाल्यामुळे राजकीय चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. दरम्यान, ठाकरे गटाचे खासदार पक्ष सोडणार असल्याच्या चर्चा सुरू असताना पक्षाचे नेते संजय राऊत यांनी सर्व दावे फेटाळून लावले आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सर्व खासदार पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत ठामपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अहिल्यानगर जिल्ह्यात मात्र भाऊसाहेब वाकचौरे यांच्या भूमिकेकडे विशेष लक्ष लागले आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या राजकीय हालचालींबाबत विविध तर्कवितर्क लावले जात असतानाच आता ऑपरेशन टायगरच्या चर्चेमुळे या चर्चांना नव्याने उधाण आले आहे. मात्र, वाकचौरे यांनी अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नसून पक्षांतराबाबत कोणतेही संकेत दिलेले नाहीत.राजकीय विश्लेषकांच्या मते, ठाकरे गटातील खासदारांपैकी मोठा गट फुटल्यास राज्याच्या राजकारणावर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि पुढील राजकीय समीकरणांच्या दृष्टीने या घडामोडी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. सध्या तरी सर्व चर्चा या राजकीय दावे आणि प्रतिदाव्यांच्या पातळीवर असून प्रत्यक्षात कोणता खासदार कोणती भूमिका घेतो, याकडे राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्याचेही लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्यांना खरिप-२०२५ कापुस पिकविमा न मिळाल्याने निवेदन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान मंडळात खरीप हंगाम-२०२५ अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे कापुस पिकाचे आतोनात नुकसान झाले होते. सदर शेतकऱ्यांनी पिक विमा उतरवून सुद्धा कापूस पिक विम्याचे पैसे न मिळाल्याने येथील शेतकऱ्यांनी तालुक्यातील लोकप्रतिनिधी व विविध शासकीय कार्यालयांना याबाबत निवेदन दिले आहे. या निवेदनामध्ये म्हटले आहे की टाकळीभान परीसरातील सर्व शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२५ यावर्षी कपाशी पिकाचा पंतप्रधान पिकविमा उतरविला होता तरी सदर ॲग्रीकल्चर कंपनीने कॅक्युलेशन करुन क्लेम रक्कम झिरो दाखविली आहे. कंपनीच्या हेप्ललाई नं. वर फोन




केल्यास ते सांगतात कि तुम्हाला पिकविमा मिळणार नाही.तरी अतिवृष्टी होवुन झालेल्या नुकसानीमुळे विमा कंपनीकडुन कुठलीही मदत मिळाली नाही. अतिवृष्टी झाली त्यावेळेस शासनाने सर्व शेतक-यांना मदत केली होती व शासनाने नुकसानीचे पंचनामे देखील केले होते. जर शासन पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत देत असेल, तर विमा कंपनी शेतकऱ्याला कोणत्या आधारावर विमा नाकारते याची चौकशी होवुन सर्व शेतकऱ्यांना न्याय मिळावा.तसेच त्याच मंडळात सोयाबिन पिकासाठी खरीप-२०२५ वेळी सोयाबिनसाठी पिक विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना मिळालेला आहे. तरी कापुस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, याबाबत पिक विमा द्वरे नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असुन कुठलीही पुर्व सुचना न देता तिव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा शेतकऱ्यांनी दिला असून तरी लवकरात लवकर सर्व शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी निवेदनाद्वरे शेतकऱ्यांनी मागणी लोकप्रतिनिधी व शासकीय कार्यालयांकडे केली आहे. या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, श्रीरामपूरचे आ. हेमंत ओगले, तहसीलदार श्रीरामपूर, कृषी अधिकारी श्रीरामपूर सर्वांना निवेदन देण्यात आल्या आहे. निवेदन प्रसंगी टाकळीभान येथील शेतकरी कान्हा खंडागळे,(उपसरपंच ,ग्राम.टाकळीभान) भाऊसाहेब पवार,नारायण काळे, माजी चेअरमन एकनाथ पटारे, ,भाऊसाहेब पटारे, संजय पटारे, राजेंद्र कोबरणे ,मच्छिंद्र पटारे, अक्षय कोकणे, पाराजी पटारे, सुजित बोडखे ,सचिन वेताळ आदी सह शेतकरी बांधव उपस्थित होते

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरशिंदे येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील खरशिंदे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरशिंदे येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या १७ नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. तसेच शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण व शैक्षणिक प्रगतीमुळे इतर शाळांतून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी व पाचवीमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

प्रवेशोत्सवानिमित्त नवागत विद्यार्थ्यांची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसरात



आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मिरवणुकीनंतर शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, स्वागत टोपी व खाऊ देऊन जंगी स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने 'पहिले पाऊल' उपक्रमांतर्गत भाषिक, सामाजिक, भावनिक विकास तसेच गणनपूर्व तयारी याविषयी विविध शैक्षणिक साहित्यांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तकांचेही वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शाहरुख शेख, उपाध्यक्षा माधुरी वाडेकर, सामाजिक कार्यकर्ते भैय्यासाहेब इनामदार यांच्यासह अजीज शेख, अरबाज शेख, जब्बार शेख, रावसाहेब कोळसे, सतीश वाडेकर, सखाराम भुसारी, सत्यजित वाडेकर, प्रशांत वाडेकर, पोपट वाडेकर, नाना वाडेकर, राहुल पंडित, गणेश भुसारी तसेच ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक विजय गागरे, शिक्षक मनोहर यादव व बाळू गावडे यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेच्या या उपक्रमाचे ग्रामस्थ व पालकांकडून कौतुक करण्यात आले.

## गटकळ स्कूलमध्ये नवीन विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** नवीन शैक्षणिकवर्षाची सुरुवात गटकळ स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये अतिशय उत्साहात करण्यात आली. यावर्षी प्रथमदिनी गटकळ स्कूलमध्ये नवीन विद्यार्थ्यांची संख्या उत्स्फूर्त होती. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड भाऊसाहेब टेमक व ॲड सुरेखा टेमक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचा स्वागताचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबाची फुले वाटण्यात आली . शाळेमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती, तसेच ॲड. भाऊसाहेब टेमक व ॲड. सुरेखा टेमक यांचे चिरंजीव अजिंक्य टेमक यांनी नुकतीच एलएलबी परीक्षा उत्तीर्ण झाल्या निमित्त त्यांचाही सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला . सत्कारा प्रसंगी त्यांनी आपल्या मनोगतांमध्ये द्विार्थ्यांना मार्गदर्शन केले . तसेच ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत लांडगे यांचाही सत्कार वाढदिवसानिमित्त करण्यात आला. शाळेच्या प्राचार्या भारती कुदळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या प्राचार्या ,सुपरवायझर , सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## वाकडीच्या खंडोबा मंदिरात सोमवती अमावास्या उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वाकडी :** राहाता तालुक्यातील वाकडी येथील खंडोबा मंदिरात नेहमीप्रमाणे सोमवती अमावास्या उत्साहात साजरी करण्यात आली. रविवारी सायंकाळी मल्हारी भक्त व वाघे मंडळी देवाचे मुखवटे पुणतांबा येथील गोदावरी नदीत स्नान घालण्यासाठी मुक्कामी घेऊन गेले होते. सोमवारी सकाळी देवाच्या मुखवट्यांना गोदावरी नदीत पवित्र स्नान घालून पूजा आरती करून भंडाऱ्याची उधळण करून देवाची पालखी वाजत गाजत, पालखी मार्गावर भंडारा उधळून,जय मल्हार च्या जयघोषात वाकडीत आणण्यात आली. खंडोबा मंदिरात पालखी आल्यावर आरती करून देवाचा प्रसाद वाटप करण्यात आले.

## सौ. भागीरथीबाई तनपुरे कन्या विद्यालयात विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत

**राहुरी :** सौ. भागीरथीबाई तनपुरे कन्या माध्य.व उच्च माध्य. विद्यालय, राहुरी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींचे उत्साहपूर्ण वातावरणात व बँड पथकाच्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार प्रसाद तनपुरे व राहुरी येथील प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ.सुवर्णा गोलेच्या मॅडम, पत्रकार संजय कुलकर्णी, सेवानिवृत्त शिक्षिका सौ कराळे मॅडम व पालक लांबे भाऊसाहेब इ.उपस्थित होते. आलेल्या विद्यार्थिनींचे गुलाब पुष्प, खजूर देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले. ''हम होंगे कामयाब''हे गीत गाऊन डॉ. सुवर्णा गोलेच्या यांनी मुलींना तुम्ही शिका मोठ्या व्हा व त्याचबरोबर एक आदर्श गृहिणी बना असे आवाहन केले. त्यांनीही विद्यार्थिनींना खाऊ दिला. डॉ सुवर्णा गोलेचा यांचा विद्यालयाच्या वतीने शाल, पुस्तक व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर मा.खा. प्रसाद तनपुरे विद्यार्थिनींना मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, मुलींनी शिक्षणाच्या बळावर आत्मविश्वासपूर्ण, सक्षम आणि स्वावलंबी बनावे, जीवनात मोठे ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे महत्त्व अधोरेखित करत आपले व्यक्तिमत्व आंब्याच्या झाडासारखे बहु आयामी असावे. शिक्षण हेच उज्ज्वल भविष्य घडविण्याचे प्रभावी माध्यम असून प्रत्येक विद्यार्थिनीने आपल्या क्षमता ओळखून प्रगतीची नवी शिखरे गाठावीत, अशा शुभेच्छाही त्यांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमानंतर विद्यार्थिनींना व उपस्थित पालकांना मिष्ठांन्न भोजन देण्यात आले. रूपाली कुऱ्हाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी विद्यालयाची पाहणी करण्यासाठी राहुरी तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार संध्या दळवी या उपस्थित होत्या. त्यांनी संपूर्ण विद्यालयाची पाहणी करून विद्यार्थिनींसाठी उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सुविधा, भौतिक सोयी-सुविधा तसेच विद्यार्थिनी सुरक्षितता इ.बाबत समाधान व्यक्त करत विद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शुभांगी उंडे, उपमुख्याध्यापिका ज्योती दिघे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशनचे पंढरपूरला ५ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** भारत सरकारद्वरे मान्यताप्राप्त व नोंदणीकृत जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशन महाराष्ट्र-दिल्ली यांच्या वतीने संस्थेचे ५ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन रविवार दि. २८ जून २०२६ रोजी पंढरपूर येथे आयोजित करण्यात आले आहे.या अधिवेशनास विविध क्षेत्रातील मान्यवर,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार, मानवाधिकार क्षेत्रातील पदाधिकारी तसेच जनप्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याचे जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशन महाराष्ट्र-दिल्लीचे प्रसिद्धी विभाग प्रमुख नरेंद्र काळे यांनी सांगितले.

या संदर्भात फेडरेशनचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष हरी आप्पा प्रभाळे यांनी मान्यवरांना निमंत्रण पत्र पाठवून अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. मानवसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतून कार्यरत असलेल्या जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशनने गेल्या पाच वर्षांत समाजहिताचे विविध उपक्रम राबवून जनतेच्या न्याय, हक्क आणि अधिकारांसाठी भरीव कार्य केले आहे.

अधिवेशनामध्ये मानवाधिकार संरक्षण,सामाजिक न्याय,पत्रकार संरक्षण, महिला व बालहक्क, नागरिकांचे मूलभूत अधिकार, प्रशासनातील पारदर्शकता तसेच समाजहिताच्या विविध विषयांवर चर्चा होणार असून देशभरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

या अधिवेशनातून संघटनेच्या पुढील कार्य व दिशा निश्चित करण्यात येणार असून मानवाधिकार चळवळीला अधिक बळकटी देण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. समाजातील वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटनेची बांधिलकी कायम राहणार असल्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशनच्या सर्व राष्ट्रीय, राज्य, विभागीय, जिल्हा, तालुका व शहरस्तरीय पदाधिकारी, सदस्य, पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते आणि मानवाधिकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे असे आवाहन पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष हरी आप्पा प्रभाळे यांनी केले आहे.

**change of name**

Old name: AYAAN KHALID BAGWAN IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is AYAN KHALID BAGWAN as on Aadhar Card Number is 619271837798 (16/06/2026)

**change of name**

मी uttakarsh dahiwale माझे आधारकार्ड वरील नाव uttakarsha rajendra dahiwale असून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र प्रमाणपत्र वरील नाव uttakarsh rajendra dahiwale दोन्ही व्यक्ती एक आहे.आधारकार्ड नंबर 975123764150

## निधन वार्ता

### राजेंद्र सोनवणे



**पानेगांव :** नेवासा तालुक्यातील पानेगांव येथील मिस्तरी नावाने परिचित असणारे प्रगतिशील शेतकरी राजेंद्र पोपट सोनवणे यांचे अल्पशा निधन झाले (वय-६२) त्यांच्या पश्चात पत्नी ,एक मुलगा, भाऊ पुतणे, सुन, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. वेल्डर राहुल सोनवणे यांचे वडील होत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### नशिबाची परिक्षा

बुधवार दि. १७ जून २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-६ | १५० १६९ ६०० | जोड ५९-१६-३२-८०-६४ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९ २८९ २२५ | २-९ | १२८ ४५० ११७ | जोड २१-८९-०३-७५-९६ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २७० २८९ २२५ | ९-५ | १४० २३० ७८० | जोड ९०-४५-१३-२६-५७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 1 | | | | |

## मक्तापुर साळवे वस्ती जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

नेवासा(प्रतिनिधी) तालुक्यातील मक्तापूर येथे जिल्हा परिषद शाळा साळवे वस्ती येथे इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठया उत्साहात स्वागत करण्यात आले.यावेळी उपस्थित नवीन मुलामुलींना पुस्तके,कपडे,शालेय साहित्याचे मराठा सुकाणू समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी बोलतांना गणेश झगरे म्हणाले की जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण मिळणार असल्याने आपल्या पहिलीच्या मुलांना आपण आनंदाने शाळेत पाठवा,सध्याच्या परिस्थितीमध्ये जिल्हा परिषद शाळा मुलांची संख्या कमी असून ही संख्या वाढविणे सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी यावेळी बोलतांना



सांगितले यावेळी रवी माहेगावकर व शिक्षिका सीमा मॅडम यांनी पहिलीत प्रवेश घेणाऱ्या मुलांचे स्वागत केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी दीपक साळवे, बाळासाहेब शिरसाठ,प्रदीप साळवे,अमोल शिरसाठ, सुनील गव्हाणे,संदीप बर्डे, सुरेश बर्डे,दादासाहेब बर्डे, रावसाहेब गव्हाणे,सोमनाथ गायकवाड,सचिन गायकवाड, मोहन खैरे.सुदर्शन इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोळेतर,शिक्षक शकूर इनामदार,दिगंबर कांगुणे, मनोज झगरे अविनाश बर्डे यांच्यासह मक्तापूर ग्रामस्थ उपस्थित होते.

द • ख • ल

## क्रिकेट सामन्यातील वादातून तरुणावर हल्ला बॅट आणि स्टम्पने केली बेदम मारहाण

**अहिल्यानगर:** शहरातील न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर क्रिकेट सामन्यादरम्यान झालेल्या किरकोळ वादाचे पर्यावसान एका तरुणावर जीवघेणा हल्ला होण्यात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी चार आरोपींविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून जखमी तरुणावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, विद्या विहार कॉलनी येथे राहणारा पंधरा वर्षीय महाविद्यालयीन तरुण यथार्थ कल्पेश परदेशी हा आपल्या मित्रासोबत न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर क्रिकेट खेळण्यासाठी गेला होता. भवानी टायगर्स आणि हरिहरेश्वर किंग्स या दोन संघांमध्ये सामना सुरू असताना एका चेंडूवरून खेळाडूंमध्ये जोरदार वाद झाला. सामना संपल्यानंतर वाद मिटवण्याच्या बहाण्याने आरोपींनी यथार्थला कॉलेजच्या मुख्य गेटवर बोलावून घेतले. तेथे दबा धरून बसलेल्या कुणाल घेगडे याने यथार्थच्या जबड्यावर क्रिकेटच्या बॅटने जोरदार प्रहार केला. त्यानंतर सोहम बिंगी याने स्टम्पने त्याच्या हातावर आणि खांद्यावर गंभीर मारहाण केली, तसेच जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. सोबत असलेल्या ओम घेगडे आणि हर्ष देवळालीकर यांनी यथार्थला जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. याप्रकरणी पोलिसांनी कुणाल घेगडे, ओम घेगडे, सोहम बिंगी आणि हर्ष देवळालीकर यांच्याविरुद्ध मारहाण आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवला आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल लोणारे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गोंटला या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## तब्बल १६८ वेळा रक्तदान अशोक भालके यांचा गौरव

**अहिल्यानगर :** रक्तदान हेच श्रेष्ठ दान मानले जाते. या विचाराला आयुष्यभर कृतीतून जपणारे आणि तब्बल १६८ वेळा रक्तदान करून



समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणारे सामाजिक कार्यकर्ते अशोक भालके यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र भूषण २०२६' पुरस्कार जाहीर झाला आहे. पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, दि. २० जून रोजी पुणे येथे आयोजित विशेष सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते भालके यांचा गौरव केला जाणार आहे. कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी ही माहिती दिली. भालके यांच्या दीर्घकालीन समाजसेवेची आणि रक्तदान क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत पुरस्कार निवड समितीने त्यांची निवड केली. मूळचे चांदा (ता. नेवासा) येथील रहिवासी असलेले अशोक भालके हे जिल्हा परिषद आरोग्य विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत. शासकीय सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी समाजसेवेचा वसा जपला. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर मदत मिळावी, रक्तदानाबाबत असलेले गैरसमज दूर व्हावेत आणि तरुणांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. भालके यांनी केवळ स्वतः रक्तदान करण्यापुरते कार्य मर्यादित न ठेवता विविध गावांमध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, जनजागृती कार्यक्रम तसेच मार्गदर्शन उपक्रम राबविले. पुणे येथे होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, आशू सुरपूर, संदीप रासकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात समाजसेवा, शिक्षण, कला, साहित्य आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. 'महाराष्ट्र भूषण २०२६' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भालके यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## कार चालकाला बंदुकीच्या धाकाने लुटले

**अहिल्यानगर :** पुणे येथून प्रवासी घेऊन निघालेल्या एका उबेर कार चालकाला भररस्त्यात बंदुकीचा धाक दाखवून लुटल्याची घटना नगर तालुक्यातील खोसपुरी शिवारात घडली आहे. चोरट्यांनी केवळ कार चालकाचे पैसे आणि सोन्याची अंगठीच लुटली नाही, तर त्याला बेदम मारहाण करून त्याची स्विफ्ट डिझायर कार देखील बळजबरीने चोरून नेली.या थरारक घटनेमुळे ट्रॅव्हल्स चालक आणि प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत विशाल सूर्यकांत कट्टीमनी यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे टूर आणि ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करतात. ते आपल्या ताब्यातील स्विफ्ट डिझायर कार (क्र. एमएच १२ वाय बी ८४८१) द्वारे ऑनलाईन उबेर पवरून बुकिंग घेऊन पुणे येथील वाकडेवाडी एसटी स्टँडवरून मळेवाडी, शेवगाव येथे जाण्यासाठी ३ प्रवाशांना घेऊन निघाले होते. प्रवास सुरू असताना,१४ जून रोजी पहाटेच्या सुमारास नगरच्या पुढे गेल्यावर खोसपुरी शिवार परिसरातील रिलॅक्स हॉटेलच्या पुढे १५० मीटर अंतरावर गाडी आली असता,गाडीतील एका प्रवाशाने लघवी करण्यासाठी गाडी थांबवण्यास सांगितली. चालकाने गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली.तो प्रवासी लघवी करून पुन्हा गाडीत येऊन बसला.गाडी पुन्हा सुरू होताच,पाठीमागील सीटवर बसलेल्या अज्ञात इसमाने अचानक फिर्यादी विशाल यांच्या डोक्याला बंदूक (पिस्तूल) लावली.त्याच वेळी त्यांच्या शेजारी बसलेल्या इसमाने त्यांचे हात घट्ट पकडले आणि पाठीमागील दुसऱ्या इसमाने दोरी काढून फिर्यादीचे हात बांधून टाकले.एवढ्यावरच न थांबता,आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यात कोणत्यातरी जड आणि टणक वस्तूने प्रहार करून गंभीर दुखापत केली आणि त्यांना चालत्या गाडीतून खाली ढकलून दिले. यानंतर आरोपींनी गाडीतील रोख रक्कम,फिर्यादीच्या हातातील सोन्याची अंगठी आणि ५,७०,५०० रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ऐवज बळजबरीने घेऊन घटनास्थळावरून पोबारा केला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात हे करत आहेत.आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

## समाजसेवा आणि रुग्णसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल मंगेश चिवटे यांचा सत्कार

**अहिल्यानगर :** समाजातील गोरगरीब, सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांसाठी अहोरात्र कार्यरत राहून रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हा विचार कृतीतून जपणारे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन चिवटे गौरव करण्यात आला. त्यांच्या वैद्यकीय, सामाजिक आणि जनकल्याणकारी कार्याचा यावेळी उपस्थित मान्यवरांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या मूळ संकल्पनेचे शिल्पकार, तत्कालीन मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे माजी कक्षप्रमुख, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे कक्षप्रमुख, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक अध्यक्ष तसेच महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात आला.कार्यक्रमात बोलताना शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश लोंढे म्हणाले की, मंगेश चिवटे यांनी लाखो गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत मिळवून देत मानवसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष अहिल्या नगर दक्षिण जिल्हा प्रमुख अनिल लंके, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष अहिल्यानगर जिल्हा प्रमुख महिला आघाडी सुनीता शेळके, पारनेर तालुका प्रमुख स्वप्नील सोमवंशी, डॉ संतोष रासकर, नेवासा तालुका प्रमुख राजेंद्र साळवे, अकोले तालुका प्रमुख विनय ईदे, सागर फुलारी परिश्रम घेतले.कार्यक्रमात विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# 'एल-निनो'च्या पार्श्वभूमीवर पाण्याचे नियोजन करा : डॉ. आशिया

### अनधिकृत पाणी उपसा केल्यास वीजपुरवठा खंडित करा



### पाणीसाठा आरक्षण व कृषी नियोजनाबाबत आढावा बैठक संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** 'एल-निनो'च्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणारी परिस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करावे. शासनाच्या २०१८ च्या निर्णयानुसार पिण्याच्या पाण्याचे आरक्षण प्राधान्याने राखून कालवे व बॅकवॉटर क्षेत्रातील अनधिकृत पाणी उपसा तात्काळ थांबवावा. आवश्यकतेनुसार अशा ठिकाणांवरील वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'एल-निनो'चा संभाव्य प्रभाव, पाणीसाठा आरक्षण व कृषी विभागाच्या उपाययोजनांबाबत आयोजित तातडीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, नगरपालिका प्रशासन अधिकारी डॉ.प्रदीप पठारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.विरेंद्र बडदे, नायब तहसीलदार भारती घोरपडे तसेच कृषी, जलसंपदा, महापालिका व महसूल विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन शेतीसाठी देण्यात येणारे पाणी आवर्तन तात्काळ बंद करण्यात यावे. जलसंपदा विभागाने पाणीचोरी रोखण्यासाठी तात्काळ भरारी पथके नियुक्त करावीत. कालवे व बॅकवॉटर क्षेत्रात सुरू असलेला अनधिकृत पाणी उपसा त्वरित बंद करावा. आवश्यकतेनुसार संबंधित विद्युत वितरण केंद्रे बंद करून वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

महापालिका, नगरपालिकांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण भागात उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. स्थानिक परिस्थितीनुसार नागरिकांना दैनंदिन किंवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच जलसंपदा विभागाच्या मुख्य व कार्यकारी अभियंत्यांनी विद्यमान पाणीसाठ्याची स्थिती तपासून पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सविस्तर नियोजन आराखडा तातडीने सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

कालव्यांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्यास अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे अधिक किफायतशीर व पाणी बचतीचे ठरत असेल, तर त्या पर्यायाची तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर तपासणी करावी, असे निर्देशही श्री.आशिया यांनी बैठकीत दिले.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे. जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्याशिवाय व समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे. उतारावर आडवी पेरणी करण्याबाबत जनजागृती करावी. जिल्ह्यात खते व बियाण्यांची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र खतांचा काळाबाजार, लिकिंग तर होत नाही ना याची कृषी विभागाने भरारी पथकांच्या माध्यमातून तपासणी करावी. खत व बियाणे पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी आणि 'डिजिटल पीक पाहणी' मोहीम तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या.

जिल्ह्यात सुरू असलेली जलसंधारणाची कामे, गाळ काढण्याची कामे व इतर पाणी साठवण क्षमतेत वाढ करणारी कामे जलद गतीने पूर्ण करावीत, जेणेकरून उपलब्ध पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त साठा निर्माण करता येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी सांगितले.

## वृक्षसंवर्धनाने महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिरात प्रवेशोत्सव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेला शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाला हरियाली संस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेश खामकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पारंपारिक पद्धतीने औक्षण करून त्यांचे विद्यालयात मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला नव विद्या प्रसारक मंडळाचे मानद सहसचिव श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. कल्पना काळोखे, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या गानकोकिळांनी सादर केलेल्या ईशस्तवन आणि स्वागतगीताने झाली.

विद्यालयाच्या मा.मुख्याध्यापिका श्रीमती मंदा शिंदे मॅडम यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सर्वांगीण विकासाच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. प्रमुख अतिथींचा परिचय श्री. प्रशांत कुलकर्णी सर यांनी करून दिला.

यावेळी विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पाठ्यपुस्तके, वह्या आणि पेन यांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साहामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. आपल्या मनोगतात प्रमुख अतिथी श्री. सुरेश खामकर यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. झाडे ही मानवजातीची अमूल्य संपत्ती असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्येकाने आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन श्री. प्रशांत कुलकर्णी सर यांनी केले. नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत, शैक्षणिक साहित्याचे वितरण तसेच पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश यामुळे प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

## व्यंकनाथ विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत करून पाचवी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर आगमन होताच शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. यावेळी नागवडे कारखान्याचे माजी संचालक विलासराव काकडे, स्कूल कमिटीचे सदस्य पुरुषोत्तम बापू लगड, संदीप डांगे, माजी प्राचार्य बाळासाहेब शेंडे, पत्रकार संतोष गोरखे, प्राचार्य बाळासाहेब जठार व सेवक वृंद उपस्थित होता.

याप्रसंगी नागवडे कारखान्याचे संचालक व स्कूल कमिटीचे अध्यक्ष डी आर काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेच्या पहिल्याच दिवशी शालेय व्यवस्थापन समितीच्या व पालकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना संचालक काकडे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष देऊन शाळेची शिस्त अबाधित ठेवावी, शिक्षकांनी दिलेले ज्ञान अंगीकारावेत. यावेळी विद्यालयाचे माजी प्राचार्य बाळासाहेब शेंडे म्हणाले की, प्रथम शालेय विद्यार्थ्यांनी शाळेची शिस्त पाळावी. सूत्रसंचालन उपशिक्षक ज्ञानदेव धायगुडे यांनी केले तर आभार उपशिक्षिका नौशाद शेख यांनी मानले.

## वांबोरी चारी टप्पा दोन रखडला

### गतीने काम करण्याची पालवेंची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**करंजी :** वांबोरी चारी टप्पा-दोन योजनेचे काम सुरू होऊन तब्बल दीड वर्षांचा कालावधी उलटून गेला असला तरी काम अद्यापही अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने लाभधारक शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. हे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने आणि संबंधित ठेकेदाराने आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी माजी सभापती संभाजी पालवे यांनी केली आहे.

पालवे यांनी सांगितले की, धरणापासून साठवण क्षमतेच्या टाकीपर्यंतचे काम काही प्रमाणात वेगाने सुरू असले तरी साठवण टाकीपासून वितरण तलावापर्यंतचे काम अत्यंत मंद गतीने चालू आहे. दोन वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित असलेल्या या प्रकल्पाचे सध्या केवळ ३० टक्केच काम पूर्ण झाले आहे. अनेक ठिकाणी पाइपलाइन टाकल्यानंतर रस्त्यांवरील पॅच तसेच सोडण्यात आले असून चार ठिकाणी हायड्रोलिक चाचण्या होणे अपेक्षित असताना आतापर्यंत केवळ एका ठिकाणीच चाचणी पार पडली आहे.

संबंधित ठेकेदार आणि मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता हे या विलंबाला जबाबदार असल्याचा आरोप पालवे यांनी केला. कामाबाबत माहिती विचारली असता समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याचीही त्यांनी खंत व्यक्त केली. लवकरच पावसाळा सुरू होणार असून शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर अनेक ठिकाणी काम करणे अशक्य होईल. त्यामुळे दोन वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट कसे साध्य होणार, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

यंदा दुष्काळाची शक्यता व्यक्त केली जात असताना हे काम उन्हाळ्यापूर्वी पूर्ण झाल्यास परिसरातील मोठ्या भागाला पाणी उपलब्ध होऊ शकते. अन्यथा लाभधारक शेतकऱ्यांसह जलसंपदा मंत्री व पालकमंत्री ठरवहरज्ञीळीहपर तळज्ञहश झरींळश्र यांच्याकडे तक्रार करण्यात येईल, असा इशारा पालवे यांनी दिला. यावेळी सरपंच अंबादास डमाळे, भानुदास डमाळे, रामनाथ शिरसाठ, वासुदेव पालवे, उपसरपंच मारोतराव शिरसाठ आदी उपस्थित होते.

## ना.आठवलेंच्या उपस्थितीत ७ जुलैला संकल्प मेळावा

### डॉ. आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**हातगाव :** आरपीआयचे (आठवले गट) राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या ७ जुलै रोजी दक्षिणेतील आरपीआयच्या कार्यकर्त्याचा भव्य मेळावा शेवगाव येथे घेण्यात येणारं असल्याबाबतची माहिती आरपीआयचे दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील साळवे व उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात यांनी दिली आहे.शेवगाव येथील शासकीय विश्रामगृहात साळवे व थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यकर्त्याच्या बैठकीत ते बोलत होते. अहिल्यानगरच्या दक्षिण विभागात पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यासाठी ज्या वेळी ना. आठवलेंना साळवे,थोरात व शेवगाव तालुका प्रमुख सतिष मगर हे शिष्ट मंडळाने मुंबईमध्ये भेटले त्या वेळी त्यांनी जिल्ह्यात येण्याचे मान्य केले असून होणारा हा मेळावा संकल्प मेळावा असून याच मेळाव्या दरम्यान ना. आठवले यांच्या शुभ हस्ते शेवगाव शहरातील अहिल्यानगर मार्गावरील असणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या ठिकाणी पूर्णाकृती पुतळा बसवण्यात येणार असल्याने त्याचेही भूमिपूजन ना.आठवलेसह आरपीआयचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे ,माजी मंत्री अविनाश महातेकर व युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे,प्रदेश उपाध्यक्ष विजय वाकचौरे,जिल्हा संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव यांच्यासह पक्षाचे राज्यस्तरीय इतरही प्रमुख नेते उपस्थितीत राहणार असून या सर्वांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे.असेही या वेळी झालेल्या बैठकीत सांगण्यात आले आहे. या वेळी आरपीआयचे पाथर्डी तालुका प्रमुख बाबा राजगुरू, ज्येष्ठ कार्यकर्ते अंबादास आरोळे, सुरेंद्र थोरात, बापू मगरे,भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धचार्य संतोष पटवेकर, राहुल पवार, नवनाथ साबळे, प्रेम अंधारे, गौरव मगर यांनीही आपले विचार व्यक्त केले असून कार्यक्रमास नाना पगारे,लक्ष्मण काळोखे, संतोष अठवाल, सुनिल आहुजा, राकेश गरुड, शरद मोहिते, निरंजन बोरूडे, गौरव मगर, किरण मगर, श्रीकांत गरुड, अमोल गजभिव ,अक्षय चित्ते, आदेश साळवे,संघर्ष साळवे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी प्रास्ताविकातून संकल्प मेळाव्याबाबत सविस्तर मार्गदर्शन आरपीआयचे शेवगाव तालुका प्रमुख सतिष मगर यांनी केले असून सूत्रसंचालन महेश अंगरखे यांनी केले तर आभार बापू मगरे यांनी मानले आहेत.

# कोळी समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी मोर्चा

### जात वैधता प्रमाणपत्रासाठी तातडीने परिपत्रक काढा; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी आमदार रमेशदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोळी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी समाजबांधवांनी निदर्शने करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

अनुसूचित जमातीतील कोळी समाजाच्या बांधवांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने मिळावे, तसेच रक्त नात्यातील व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत तातडीने परिपत्रक काढण्यात यावे, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीत अनुसूचित जमातीतील नागरिकांना जातीचे दाखले आणि जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासनाने परिपत्रक जारी करणे अपेक्षित होते. मात्र, विधानसभा, नगरपरिषद, महानगरपालिका,




जिल्हा परिषद तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे लागू झालेल्या आचारसंहितेमुळे या प्रक्रियेला विलंब झाला असल्याची खंत कोळी समाजाने व्यक्त केली.

गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असून शासनाच्या दिरंगाईमुळे समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून संबंधित परिपत्रक त्वरित जारी करण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे करण्यात आली.

यावेळी कोळी महासंघाच्या वतीने संदीप मोरे, बंडा मोरे, जयंत होळकर, सुनील पवार, पोपट मोरे, कानिफ मोरे, उद्धव मोरे, मिथुन मोरे, लक्ष्मण मोरे, पंडा मोरे, शामराव मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने कोळी समाज बांधव उपस्थित होते.

प्रमुख मागण्या- अनुसूचित जमातीतील कोळी समाजाच्या नागरिकांना जातीचे दाखले सुलभ पद्धतीने मिळावेत तसेच रक्त नात्यातील व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सोपी करावी व २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करावी व संबंधित परिपत्रक त्वरित जारी करण्यासाठी शासनाने आवश्यक कार्यवाही करावी व प्रलंबित प्रश्नांवर मुख्यमंत्री स्तरावर तातडीने निर्णय घ्यावा.

द • ख • ल

## उस्मानभाई अब्दुलभाइ मुलाणी यांचे निधन



**वळती :** वळती येथील उस्मानभाई अब्दुलभाई मुलाणी (वय ५८) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली असा परिवार आहे. ते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी वसुली अधिकारी इस्माईल मुलाणी व कादरवली ब्रिक्स सप्लायर्स तसेच किराणा व्यवसायिक याकूबभाई मुलाणी यांचे बंधू होते. तसेच युवा कार्यकर्ते कासिमभाई मुलाणी यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने वळती परिसरात हळहळ व्यक्त होत असून सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रातील एक प्रेमळ व मनमिळावू व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## श्री थापलिंग खंडोबा मंदिरात सोमवती अमावस्येनिमित्त कार्यक्रम



**वळती :** नागापूर येथील श्री थापलिंग देवस्थान मंदिरात सोमवती अमावस्येनिमित्त आज (दि. १५) विविध धार्मिक कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला. सोमवती अमावस्येच्या निमित्ताने श्री खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या सर्वांगसुंदर मुखवट्यांना विधिवत स्नान घालण्यात आले. सोमवतीचा कार्यकाळ संपूर्ण दिवस असल्याने पहाटे ६ ते ७ या वेळेत श्रींचे मंगलस्नान व आरती पार पडली. यानंतर संपूर्ण गावातून श्रींच्या पालखीची भव्य मिरवणूक तसेच पारंपरिक काठी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक श्री दत्त मंदिर देवस्थान येथे मीना नदीच्या तीरावर पोहोचल्यानंतर श्रींच्या मुखवट्यांना स्नान घालून पारंपरिक पूजा-अर्चा करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता महाआरतीने झाली. देवस्थानचे अध्यक्ष देवदत्तजी निकम यांच्या शुभहस्ते महाआरती संपन्न झाली. धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी देवस्थानचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोमवती अमावस्येच्या निमित्ताने मंदिर परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला होता.

## शाळांची घंटा वाजली.. बारामतीच्या टेक्निकल विद्यालयात गुलाबपुष्प देऊन विद्यार्थांचे स्वागत.

**बारामती :** बारामतीच्या राधेश्याम एन आगरवाल टेक्निकल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज या विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ ची सुरुवात राज्यभर एकाच दिवशी म्हणजे १५ जून २०२६ पासून होत आहे. नवीन आलेल्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.शैक्षणिक वर्षाची सुरुवात विदर्भ वगळता इतर सर्व विभागांत सोमवार दि. १५ जून २०२६ रोजी तर विदर्भात सोमवार दि. २२ जून २०२६ पासून होणार आहे. शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी व मुलांची उपस्थिती वाढविण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येत आहे. यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन प्रभारी प्राचार्य श्री सतीश पाचपुते, पर्यवेक्षिका सौ.अलका चौधर तसेच उपस्थित सर्व शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले. ढोल ताशा वाजवत विद्यार्थ्यांचे स्वागत झाल्याने विद्यार्थी खूप आनंदी होते.



## परप्रांतीय व्यापारी म्हणून आले अन ऊसाचे दर ठरवणारे मालक झाले

**केडगाव :** दौंड तालुक्यात गेल्या आठ दिवसांपूर्वी जवळपास ४०० गु-हाळे बंद झाली होती त्याच मुख्य कारण अन्न प्रशासन ने गु-हाळावर टाकलेल्या घाडी , भेसळ युक्त गुळ तयार करण्यात येत असल्याची माहिती अन्न प्रशासनाला लागली होती , त्यामुळे तालुक्यातील सर्व गु-हाळांवर घाडी टाकुन बराच माल सील केला होता , नंतर अन्न प्रशासन व गु-हाळ चालक मालक यांची बैठक झाली यात ठरवण्यात आले कि भेसळ गुळ तयार करायचा नाही, सर्वांनी मान्य केले , परंतु सुरूवातीला शेत-यांच्या ऊसाला ४२०० रुपये बाजार मिळत होता , आता ३५०० रुपये बाजार दिला जात आहे, ऊसाचा बाजार ठरवण्याचा अधिकार परप्रांतीयांना देण्यात आला , परप्रांतीयांनी सांगायचे आम्हाला ३५०० रुपयांनी ऊस पाहिजे, व ऊसाची पोहच ४२०० रुपये पाहिजे, आता विषय आसा आहे कि परप्रांतीय बाहेरुन पोट भरण्यासाठी दौंड तालुक्यात आले आहे आता त्यांच्या हातात ऊसाचा बाजार ठरवण्याचा अधिकार आहे , तो अधिकार कोणी दिला, शेतकरी दिवस रात्र शेतात राबतो , त्याच्या पिकाला कवडी मोल बाजार मिळत आहे, यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आमचा ऊस ४२०० रुपयाच्या कमी देयाचा नाही, असे ठरवावे , जसे गु-हाळे चार दिवस बंद ठेवण्यात आली , तसे शेतकऱ्याच्या ऊसाला घर घर लागली , तसे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आमचा ऊस ४२०० रुपयाच्या कमी देयाचा नाही, असे ठरवल्यास शेतकऱ्यांच्या उसाला ४२०० रुपये बाजार निश्चित मिळेल , आसा विश्वास शेतकरी वर्गातून होत आहे, यासाठी शेतकरी संघटना व शेतकरी यांची प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती समजत आहे, पुढील काळात शेतकरी संघटना काय भुमिका घेत आहेत, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे,

## अनुसूचित जाती व नवबौध्द स्वयंसहायता बचत गटांसाठीमिनी ट्रॅक्टर योजनेचा लाभ ३१ ऑगस्टपर्यंत अर्जाचे आवाहन

**पुणे :** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने उपलब्ध करून देण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत किमान ९ ते १८ अश्वशक्ती क्षमतेचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करण्यासाठी प्रति पात्र बचत गटास रु. ३.१५ लाखांपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जिल्हा पुणे कार्यालय, सामाजिक न्याय भवन, सर्व्हे क्र. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे – ४११००६ येथे स्वीकारले जातील. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी बचत गट नोंदणीकृत असणे, गटाच्या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेत खाते असणे, गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असणे, सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे तसेच गटाचे अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असणे आवश्यक आहे. पात्र स्वयंसहायता बचत गटांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.

# वन विभागाकडे ७२७ कोटींच्या हरित संपत्तीची जबाबदारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

पुणे : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील सुमारे ७२७ कोटी रुपयांच्या हरितीकरण प्रकल्पाची जबाबदारी वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे देशातील सर्वात मोठ्या महामार्ग हरितीकरण प्रकल्पाच्या संवर्धनासाठी वन विभागाची भूमिका अधिक बळकट होणार असल्याची माहिती विभागीय वन अधिकारी सुनिल शिंदे यांनी दिली आहे.

नागपूर ते ठाणे दरम्यानच्या ७०१ किलोमीटर लांबीच्या समृद्धी महामार्गालगत ४,५०० हेक्टर क्षेत्रात ३० लाखांहून अधिक वृक्ष व वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये ११.३२ लाख वृक्ष, १२.५४ लाख झुडपे, ३.८० लाख वेली, सुमारे ३ लाख बांबू आणि २.९६ लाख अगेव वनस्पतींचा समावेश आहे.

या हरित संपत्तीच्या संवर्धनासाठी अत्याधुनिक सिंचन व्यवस्था उभारण्यात आली असून, त्यामध्ये ७० विहिरी, १२ जलस्त्रोत, ९ जलसाठे, ८१ पंपगृहे, २ हजार २८७ किलोमीटर जलवाहिन्या अणि १० हजार २५६ किलोमीटर ठिबक सिंचन जाळे विकसित करण्यात आले आहे. वृक्षलागवड, देखभाल, संवर्धन आणि सिंचन व्यवस्थापनाची जबाबदारी वन विभागाकडे राहणार आहे. यासाठी आवश्यक निधी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या हस्तांतरणासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असून, समृद्धी महामार्गावरील हरित पट्टा पर्यावरण संरक्षण, कार्बन शोषण, जैवविविधता संवर्धन तसेच प्रदूषण नियंत्रणात महत्त्वपूर्ण योगदान देणार असल्याचेही विभागीय वन अधिकारी सुनिल शिंदे यांनी कळविले आहे.

## सर्वेक्षणासाठी नागरिकांनी अचूक माहिती द्यावी : जिल्हाधिकारी डुडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पीएलएफएस व एएसयुएसई सर्वेक्षणात शास्त्रीय नमुना निवड पद्धतीनुसार काही निवडक कुटुंब व आस्थापनांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. ही कुटुंबे किंवा आस्थापना संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे प्रत्येक कुटुंब व आस्थापनाने दिलेली माहिती ही अत्यंत मौल्यवान असून ती जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे या सर्वेक्षणासाठी भेट देणाऱ्या प्राधिकृत अन्वेषकांना नागरिकांनी आवश्यक ती अचूक व वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री.डुडी यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत घेण्यात येणाऱ्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (पीएलएफएस) व असंघटित क्षेत्रातील उद्यामांचे वार्षिक सर्वेक्षण (एएसयुएसई) यांची पुणे जिल्ह्यात १५ जून २०२६ पासून सुरुवात करण्यात आली. या सर्वेक्षणाचा शुभारंभ जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते सर्वेक्षणाची माहिती देणाऱ्या घडीपत्रिका व बॅनरचे जिल्हाधिकारी कार्यालय येथे अनावरण करून करण्यात आला. यावेळी जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उप आयुक्त प्रियांका बोकील, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या सांख्यिकी अधिकारी तृप्ती निंबाळकर, इप्सॉस रिसर्च प्रायव्हेट लि.चे ज्ञानेश्वर काळे, प्रकल्प व्यवस्थापक अजित कोकरे, प्रादेशिक समन्वयक गायत्री लाड, समन्वयक उपस्थित होते. या सर्वेक्षणाद्वे रोजगार बेरोजगार श्रमशक्ती सहभाग दर स्वयंरोजगार, लघु व असंघटीत क्षेत्रातील उद्योग- व्यवसायांची स्थिती, कामगारांचे उत्पन्न वेतन आणि आर्थिक क्रियाकलाप यासंबंधीची माहिती संकलित करण्यात येणार आहे. संकलित माहितीच्या आधारे जिल्हास्तरीय विकास आराखडे तयार करणे, रोजगार विषयक धोरणे निश्चित करणे, उद्योग व गुंतवणूक क्षेत्रांना चालना देणे, तसेच राज्याच्या व देशाच्या विकासाचे अचूक चित्र समोर आणणे शक्य होणार आहे. सदर सर्वेक्षणासाठी इप्सोस रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नियुक्त केलेल्या अन्वेषकांमार्फत सदर सर्वेक्षण संपूर्ण महाराष्ट्र राज्यात घेण्यात येत आहे. सर्वेक्षणादरम्यान संकलित करण्यात येणारी वैयक्तिक तसेच व्यावसायिक माहिती ही पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून व्यक्ती, कुटुंब किंवा संस्थेची माहिती सार्वजनिक केली जाणार नाही तसेच तिचा वापर केवळ सांख्यिकीय विश्लेषण, विकास नियोजन व धोरण निर्मितीकरीताच केला जाणार आहे. त्यामुळे सर्व नागरिक, व्यावसायिक आस्थापना, स्वयंरोजगारधारक, लघूउद्योजक आणि संबंधित संस्थांनी सर्वे क्षणास सकारात्मक प्रतिसाद देऊन पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, प्रादेशिक कार्यालय आणि जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्यावतीने करण्यात येत आहे.

## पारगाव परिसरात अवैध धंद्यांचे जाळे? कारवाईचा धाक कुठे हरवला?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारगाव,:** पोलिस अधीक्षकांनी आंबेगाव तालुक्याकडे लक्ष देण्याची नागरिकांची मागणी पारगाव परिसरात कथित अवैध दारू व ताडी विक्री तसेच नशेच्या पदार्थांची उपलब्धता वाढत असल्याच्या चर्चांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील अनेक तरुण व्यसनाधीनतेच्या गर्तेत जात असल्याची खंत पालक व्यक्त करत आहेत.

स्थानिकांच्या मते, व्यसनाधीनतेमुळे काही ठिकाणी कौटुंबिक वाद, भांडणे आणि सामाजिक तणाव वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे गावपातळीवर जनजागृतीबरोबरच संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

पारगावच्या हद्दीतील अवैध धंद्यांना कोणाचे अभय? पारगावच्या हद्दीत काही ठिकाणी नियमबाह्य स्वरूपाचे व्यवसाय सुरू असल्याच्या चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहेत. या कथित अवैध धंद्यांवर कारवाई का होत नाही, तसेच त्यांना कोणाचे संरक्षण मिळत आहे का, असे प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

नागरिकांचे म्हणणे आहे की, संबंधित विभागांनी या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी. तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

मात्र, या सर्व चर्चांबाबत अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. उत्पादन शुल्क विभाग किंवा पोलीस विभागाकडूनही यासंदर्भात अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे वस्तुस्थिती काय आहे, याबाबत नागरिकांमध्ये विविध तर्क-वितर्क सुरू असून प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नागरिकांची मागणी : ''पोलिस अधीक्षक साहेबांनी वेळ काढून आंबेगाव तालुक्यातील परिस्थितीची दखल घ्यावी आणि आवश्यक ती चौकशी व कारवाई करावी.''

# शाही कऱ्हानदी मूर्तीस्नान, मध्यरात्री पालखी प्रस्थान व नगरप्रदक्षिणा

## त्रिकाळ सोमवती यात्रा उत्सव उत्साहात संपन्न



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या श्री खंडोबा देवाच्या सोमवती अमावस्या यात्रा उत्सवाला यंदा लाखो भाविकांची अभूतपूर्व उपस्थिती लाभली. दीड वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आलेल्या या पर्वणीमुळे जेजुरी नगरी भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाली. मध्यरात्री पालखी प्रस्थान, पहाटे कऱ्हानदीवरील शाही मूर्तीस्नान आणि त्यानंतर नगरप्रदक्षिणा अशा त्रिकाळ दर्शनाचा लाभ भाविकांनी घेतला.

शनिवारपासूनच राज्यासह देशाच्या विविध भागांतून भाविकांचे जेजुरीत आगमन सुरू झाले होते. सोमवती अमावस्येच्या पर्वकाळात मध्यरात्री देऊळवाड्यातून श्री खंडोबा पालखीला पारंपरिक पद्धतीने शिडा देण्यात आला. येथील इनामदार, सरदार व पेशवे मानकऱ्यांच्या संकेतानंतर रात्री दोन वाजता पालखीचे प्रस्थान झाले. मंदिर प्रदक्षिणा पूर्ण करून पालखी कऱ्हानदीकडे रवाना झाली.

पहाटे सूर्याच्या साक्षीने श्री मार्तंड भैरवांच्या मूर्तींना कऱ्हानदी पात्रात विधिवत शाही स्नान घालण्यात आले. ''सदानंदाचा येळकोट''च्या गजराने परिसर दुमदुमून गेला. गुरव, पुजारी, वीर कोळी व गडशी समाजाच्या पारंपरिक धार्मिक विधीनंतर ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी व सेवेकऱ्यांनी मानपानानुसार पालखीला खांदा देत आपली परंपरा जपली.

शाही स्नानानंतर पालखीचे नगरप्रदक्षिणेसाठी प्रस्थान झाले. पायरी मार्गाने गडावर परतणाऱ्या या पालखी सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पालखी मार्गावरील विविध ठिकाणी भक्तांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. वाडी ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग घेत पालखी सोहळ्याचा आनंद द्विगुणित केला.

यंदा भेसळयुक्त भंडाऱ्यावर बंदी असल्याने शुद्ध भंडाऱ्याचीच उधळण करण्यात आली. प्रमाण कमी असले तरी शुद्ध भंडाऱ्याच्या वापरामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले. राज्यात महागाई, इंधन दरवाढ आणि पावसाची प्रतीक्षा असतानाही विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने भाविक यात्रेसाठी दाखल झाले होते.

पालखी मार्गावरील रंभाऊशी पिंपळ, फुलाई माळ, जयाद्री शक्तिपीठ, जाणाई मंदिर, होळकर वाडा, गोसावी मठ आणि छत्री मंदिर या ठिकाणी पालखी सोहळा काही काळ विसावला. कऱ्हामाईच्या पवित्र प्रवाहात आपल्या कुलदैवताला स्नान घालण्याचा आणि हा ऐतिहासिक सोहळा प्रत्यक्ष पाहण्याचा लाभ मिळाल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले.

श्री मार्तंडदेव संस्थान ट्रस्ट, जेजुरी पोलीस प्रशासन, नगरपालिका तसेच स्थानिक ग्रामस्थांच्या समन्वयातून हा सोमवती यात्रा उत्सव अत्यंत शिस्तबद्ध, आनंददायी आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. लाखो भाविकांच्या उपस्थितीत झालेल्या या त्रिकाळ सोमवती दर्शन सोहळ्याने जेजुरी नगरी पुन्हा एकदा ''सदानंदाचा

## देवगावातील १५ वर्षांचा रस्त्याचा वाद अखेर मिटला

सहायक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी संयमाने सोडवला प्रश्न ; शेतकऱ्यांनी मानले आभार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** देवगाव (ता. आंबेगाव) येथे गेल्या १४ ते १५ वर्षांपासून रस्त्याच्या वापरावरून सुरू असलेला वाद अखेर सामोपचाराने निकाली निघाला असून पारगाव पोलीस ठाण्याचे साहेब पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या पुढाकाराने हा प्रश्न मार्गी लागल्याने शेतकरी व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. देवगाव येथे रस्त्याच्या वादा संदर्भात अनेक वर्षांपासून महसूल विभागासह विविध शासकीय अधिकाऱ्यांनी भेटी देऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, कोणताही कायमस्वरूपी मार्ग निघत नव्हता. आठ दिवसांपूर्वी पुन्हा एकदा रस्त्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी पारगाव कारखाना पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कांडगे यांच्याकडे तक्रार केली. तक्रारीची गंभीर दखल घेत श्री. कांडगे यांनी गावातील प्रमुख नागरिक व संबंधित शेतकऱ्यांची दोन वेळा पोलीस स्टेशनमध्ये बैठक घेतली.



त्यानंतर प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन प्रत्येकाच्या शेताची पाहणी केली तसेच सर्व संबंधितांची बाजू शांतपणे ऐकून घेतली. यावेळी त्यांनी वस्तीवरील तीनही रस्त्यांबाबत कायदेशीर बाबी आणि प्रत्यक्ष वापराच्या दृष्टीने सविस्तर मार्गदर्शन केले. सर्व शेतकऱ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत विषय स्पष्ट केल्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न सामोपचाराने मार्गी लागला. याशिवाय, भविष्यात संबंधित रस्त्याबाबत कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करून आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासनही सचिन कांडगे यांनी दिले. या निर्णयामुळे संबंधित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत श्री. कांडगे यांचे मनापासून आभार मानले. ''अशा पद्धतीने दोन्ही बाजू समजून घेऊन संयमाने प्रश्न सोडवणारा पोलीस अधिकारी आम्ही आजपर्यंत पाहिला नाही,'' अशा शब्दांत ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वादावर संवाद, समन्वय आणि प्रत्यक्ष पाहणीच्या माध्यमातून तोडगा काढण्यात आल्याने देवगाव परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मंचर बस स्थानकावर प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या चोरट्यांना अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** मंचर बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत प्रवाशांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या सराईत चोरट्यांच्या टोळीचा मंचर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी चार आरोपींना अटक करत तब्बल ६ लाख ९२ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपींकडून तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मंचर येथील बसस्थानकात प्रवासी बसमध्ये चढत असताना किंवा गर्दीत उभे असताना त्यांच्या अंगावरील दागिने व मौल्यवान वस्तू चोरण्याच्या घटना सातत्याने घडत होत्या. १८ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास मंचर एसटी स्थानकात नाशिक-पुणे बसमध्ये चढत असलेल्या शकुंतला मनोहर थिटे (वय ६१, रा. मुकुंदवाडी रोड, मंचर) यांच्या हातातील सोन्याचे बांगड्या अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत लंपास केले. याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना मंचर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला. दरम्यान, मंचर पोलिसांचे पथक रात्री गस्त घालत असताना आंबेगाव तालुक्यातील एकलहरे गाव परिसरात एचपी पेट्रोल पंपाजवळ बंद पडलेल्या मंगल कार्यालयाशेजारी संशयास्पदरीत्या उभी असलेली चक-४६-थ-३१८४ क्रमांकाची एर्टिगा कार आढळली. कारमध्ये चार जण संशयास्पद हालचाली करत असल्याचे दिसून आल्याने पोलिसांनी त्यांची चौकशी केली. चौकशीत त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता चोरीच्या गुन्ह्यांची कबुली मिळाली. अमोल सुरेश टिंडंगे (वय ४०), कपिल सुरेश टिंडंगे (वय ३८), दीपक वतन आभंगे (वय ४८), राजेश दीपक गांगंगे (वय ५८) हे सर्व आरोपी सुभाषवाडी, चांद्रपाडा, अंबरनाथ, जि. ठाणे येथील रहिवासी असून सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात समोर आले आहे. अटक आरोपींवर यापूर्वी कल्याण परिसरात एकूण १५ चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले असून मंचर व खेड पोलीस ठाण्यातील तीन गुन्हे उघड झाले आहेत. अटक आरोपींकडून पोलिसांनी ईरटीका कार सह एकूण ६ लाख ९२ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास मंचर पोलीस करत आहेत.



# धामणीच्या जिल्हा परिषद शाळेत अनोखा प्रवेशोत्सव

## उपक्रमांच्या गर्दीत शैक्षणिक गुणवत्ता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** शाळा आणि शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक स्पर्धेमध्ये उपक्रमांना जास्त महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शिक्षणापेक्षा उपक्रमांची गर्दी शाळांमध्ये होताना दिसते. यामध्ये समतोल ठेवण्याची आवश्यकता आहे. अशावेळी शैक्षणिक गुणवत्ता राखण्याचे मोठे आव्हान शाळा आणि शिक्षकांपुढे असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल जाधव यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषद शाळा धामणी येथील यंदाच्या शैक्षणिक वर्षातील प्रवेशोत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल जाधव बोलत होते. जिल्हा परिषद शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची मिरवणूक काढून, रांगोळी आणि पुष्पवृष्टी करून वाजत गाजत आनंदाने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच प्रतीक्षा जाधव होत्या.

पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळा आता अधिक स्मार्ट होत आहेत. उपक्रम आणि गुणवत्ता, नवनवीन शैक्षणिक सुविधा यामुळे खाजगी शाळांपेक्षा एक पाऊल पुढे जिल्हा परिषदेच्या शाळा जात आहेत. असे सांगून विठ्ठल जाधव म्हणाले, सध्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रचंड स्पर्धा दिसून येते. आणि खाजगी शाळा तसेच सरकारी शाळांमध्ये उपक्रम जास्त आणि गुणवत्तेला कुठेतरी वेळ कमी पडतो. अशावेळी उपक्रम आणि शैक्षणिक गुणवत्ता यांची योग्य पद्धतीने सांगड घालण्याची गरज आहे आणि तेच खरे शिक्षकांच्या पुढे आव्हान असल्याचे वाटते.



जिल्हा परिषद शाळेची मुले आता नासा, इस्रो सारख्या संस्थांपर्यंत झेप घेत आहेत. ए आय रोबोटिक लॅब सारखे उपक्रम जिल्हा परिषद शाळेत येत आहेत. मोफत शिक्षण देणारे या शाळा खाजगी शाळांपेक्षाही अधिक पुढे जात असल्याने गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये जिल्हा परिषद शाळेतील मुलांचा पट वाढतो आहे. हे देखील उल्लेखनीय बाब आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि यंदापासून जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू झालेला सीबीएससी पॅटर्न चा अभ्यासक्रम याबद्दल शिक्षण तज्ञांमध्ये मतमतांतरे असले तरी आता हा उपक्रम सुरू झाल्याने तो स्वीकारणे अपरिहार्य आहे. आता शिक्षकांची आणि पालकांची जबाबदारी यामुळे आणखीन वाढली आहे. बदलत्या शैक्षणिक वातावरणात त्यांना जमवून घ्यावे लागेल. पंचायत समिती सदस्य अंकिता वाळूज यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेच्या शैक्षणिक कामासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज,सरपंच प्रतीक्षा जाधव, अंकुश भमकर यांनी मार्गदर्शन केले. या वेळी सरपंच प्रतिक्षा जाधव, उपसरपंच अक्षय विधाटे, माजी सरपंच सागर जाधव,मुख्याध्यापक शशिकांत थोरात, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश रोडे, भाऊ कदम,उपाध्यक्ष स्वाती सोनवणे, सदस्य दीपाली जाधव,सुहास रोडे, सुनील करंजखेले ,कविता तांबे, विनोद वायकर, भानुदास जाधव,भाऊ करंडे निलेश करंजखेले, आकाश जाधव,शांताराम जाधव, आदी ग्रामस्थ उपस्थित होते

द•ख•ल

## शहरटाकळी विद्यालयात नवागतांचे स्वागत



**एरंडगाव :** शहरटाकळी विद्यालयाने अनेक रत्न, प्रशासकीय अधिकारी घडवले आहेत. येथील शिक्षक हे विद्यार्थ्यांना पोटतिडकीने शिकवण्याचे कार्य करतात. या विद्यालयात नेहमी नवनवीन उपक्रम राबवले जातात. हे विद्यालय राज्याच्या पटलावर पोहोचले आहे. येथील शिस्त सर्वश्रुत आहे.तेव्हा विद्यार्थ्यांनी चांगले संस्कार, ज्ञानर्जन करून पुढील भविष्याचा वेध घ्यावा असे प्रतिपादन ॲड. अनिल मडके यांनी केले. आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इ.५वी ते १२वी मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या नवगतांचे ढोल ताशांच्या गजरामध्ये वाजत गाजत मिरवणूक काढून जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रम अध्यक्षस्थानी मडके बोलत होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते वाय.डी.कोल्हे, ज्ञानदेव गवारे, यांनी विद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रम व उपक्रमांबद्दल आपल्या मनोगतातून समाधान व्यक्त केले. यावेळी इ.५वी व ८वी शिष्यवृत्ती मध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसह मार्गदर्शन शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील वखरे, पोपटराव खराडे, यव्हान कोल्हे, पर्यवेक्षक पोपट खताळ, दादासाहेब मुरकुटे, माता पालक माळवदे, निकम, देशमुख, रेखा मेरड यांच्यासह बहुसंख्य पालक, ग्रामस्थ, सर्व शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी उपस्थित होते.

## संभाजी ब्रिगेडच्या तालुका प्रवक्तेपदी प्रा. मिसाळ कार्याध्यक्ष जगताप, महांडुळे सचिव




**श्रीगोंदा :** संभाजी ब्रिगेडची तालुका आढावा बैठक तालुकाध्यक्ष इंजि. शामभाऊ जरे यांच्या अध्यक्षतेखाली श्रीगोंदा येथे उत्साहात पार पडली. बैठकीत संघटन विस्तार, आगामी उपक्रम तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रसिद्ध शिवव्याख्याते, लेखक आणि सामाजिक विचारवंत प्रा. महेंद्र मिसाळ यांनी संभाजी ब्रिगेडमध्ये प्रवेश केला. त्यांच्या वैचारिक आणि सामाजिक कार्याची दखल घेत त्यांची तालुका प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच प्रफुल्ल उर्फ बापू जगताप यांची तालुका कार्याध्यक्षपदी तर रवींद्र महांडुळे यांची तालुका सचिवपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी अनेक युवकांनीही संभाजी ब्रिगेडमध्ये प्रवेश केला. नव्याने प्रवेश केलेल्या युवकांनी तालुकाध्यक्ष इंजि. शामभाऊ जरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत संघटनेच्या समाजाभिमुख, संघर्षशील आणि लोकहितवादी कार्यपद्धतीमुळे संघटनेत सहभागी झाल्याचे सांगितले. बैठकीस संभाजी ब्रिगेड शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष दिलीप आबा वाळुंज, तालुका उपाध्यक्ष दिलीप लबडे, शेतकरी आघाडीचे तालुकाध्यक्ष उत्तम घागरे, तालुका उपाध्यक्ष पांडुरंग खोरे, कामगार आघाडीचे तालुकाध्यक्ष घनश्याम काळे, संघटक संतोष आरडे (मेजर), अल्पसंख्याक आघाडीचे तालुकाध्यक्ष सद्दाम शेख, शहराध्यक्ष अक्षय दहातोंडे, संघटक दत्तात्रय दिवटे, गणेश पाचपुते यांच्यासह तालुक्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांचे यावेळी अभिनंदन करण्यात आले.

## लिंपणगावात दुष्काळजन्य परिस्थिती टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची मागणी

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथे निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळजन्य परिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे तातडीने टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. याबाबत किरण बाळू कुरूमकर यांनी ग्रामस्थांच्या वतीने ग्रामविकास अधिकारी तथा प्रशासक, ग्रामपंचायत लिंपणगाव यांना निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की,, गावातील विहिरी, बोअरवेल तसेच पाण्याचे इतर स्रोत कोरडे पडल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. हंडाभर पाण्यासाठी महिला व ग्रामस्थांची भटकंती सुरू आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना दूरवरून पाणी आणावे लागत असून, गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालला आहे. वास्तविक पाहता ग्रामपंचायतीचे प्रशासक व ग्रामविकास अधिकारी यांनी गावातील प्रत्येक पेठेत पाणीटंचाईची पाहणी करावी असे सांगून या निवेदनात आणखी पुढे म्हटले आहे की, ग्रामस्थांच्या आरोग्याचा व मूलभूत गरजांचा विचार करून लिंपणगावात तात्काळ टँकरद्वारे नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच आवश्यक त्या प्रशासकीय कार्यवाहीद्वारे गावकऱ्यांची पाण्याची गैरसोय दूर करण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या गंभीर प्रश्नाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. निवेदनावर अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून, पाणीटंचाईच्या समस्येबाबत गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## रूपीबाई मोतीलालजी बोरा शाळेत उत्साहात प्रवेशोत्सव



**नगर तालुका :** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. १५ जून रोजी सुट्टीनंतर शाळा सुरू झाली. यावेळी फुग्यांची आरास करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांना प्रशालेचे प्राचार्य रविकिरण भांड, उपप्राचार्या वनिता बोऱ्हाडे व पर्यवेक्षक विष्णू गिरी यांच्या हस्ते पुस्तक वितरण करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य रविकिरण भांड म्हणाले की, शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांचा उत्सुकतेचा व आनंदाचा असतो. विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य तसेच आनंद निर्माण करण्यासाठी शाळेने प्रवेशोत्सव साजरा केला होता. पालक व विद्यार्थी यांच्यात सहृदयता निर्माण करण्यासाठी अशा उत्सवांची गरज असते.कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. राजळेंची राजकिय सुत्रे 'कृष्णा'च्या हाती!

अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील भाजपच्या राजकीय गोकुळासारख्या रणांगणात युवा मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती होत आ. मोनिका राजळे यांचे जेष्ठ चिरंजीव 'कृष्णा' चा अवतार प्रकट झाला. यशोदासम मोनिका मातेच्या राजकीय विरोधकांचा कर्दनकाळ ठरविण्यासाठी कृष्णा सेना गेल्या काही दिवसांपासून कार्यरत होती. आ. मोनिका राजळे यांचे विश्वासू सहकारी तथा दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्याच्या भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर यांनी आज जिल्हा कार्यकारिणीची यादी जाहीर केली. यादीमध्ये आगामी जिल्हा परिषद निवडणुकांचे बीजारोपण करत मिरी गटा वर डोळा ठेवून चाललेली धावपळ कार्यकर्त्यांनाही चकवा देणारी ठरत आहे. तालुक्याच्या राजकारणात भाजपमध्ये कोणी कितीही नाकारले तरी सुप्त अवस्थेत गटबाजी आहे. मूळ भाजप, हिंदुत्ववादी संघटनांची सहानुभूती असलेली भाजप, आ. मोनिका राजळे यांच्या निष्ठावानांची भाजप, पालकमंत्री विखे यांना मानणारी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस मधील नेते ॲड. प्रताप ढाकणे यांच्या विषयी सहानुभूती बाळगणारी भाजप, अशा गटबाजीत युवक आघाडीच्या रूपाने कृष्णा राजळे यांच्या मित्रमंडळाची भाजप वेगाने सक्रिय झाल्याने भाजप अंतर्गत तालुक्यात विशेषतः शेवगाव पाथर्डी मतदारसंघात आता आ. राजळे यांचे मॉल झाले आहे.



अत्यंत चतुराईने त्यांनी सर्व गटातील प्रमुख कार्यकर्त्यांना चुचकारत पक्षांतर्गत शांतता ठेवण्याचा प्रयत्न केला तरी दोन महिन्यांपूर्वी पालिकेमध्ये विखे राजळे यांना मानणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये एकच लवंगी फटाकडा जाहीर रित्या वाजला त्यामुळे त्याचा आवाजही तेवढाच झाला. पालिकेच्या बैठकीमध्येच आम्ही सुद्धा विखेंना मतदान केले आहे अशा पद्धतीचा सुर सदस्यांच्या तोंडातून अडवला गेल्याने विखे गटाचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांना नरमाईचे धोरण स्वीकारावे लागले. आजही पालिकेमध्ये सत्तेत असूनही आव्हाड पूर्वीसारखे फारसे समाधानी नाहीत. त्यामुळे त्यांनी सुद्धा विरोधकांची हात मिळवणी करत स्वतःची ताकद दाखवून देण्याचा वेगळा अजेंडा अमलात आणायला सुरुवात केली आहे. अशा पार्श्वभूमीवर आ. मोनिका राजळे यांनी 'कृष्णा' यांना पक्ष संघटनेच्या माध्यमातून राजकीय मैदानात आणले आहे. मा.आ.स्व. राजीव राजळे यांनी तालुका खरेदी-विक्री संघाच्या माध्यमातून राजकीय वर्तुळामध्ये स्वतःची ओळख दिली होती. तिसऱ्या पिढीने तालुक्याच्या राजकीय वर्तुळात प्रवेश करताना अत्यंत हुशारीने पक्ष संघटनेच्या माध्यमातून प्रवेश केला आहे त्यामुळे कोणतीही उमेदवारी मिळवताना पक्षातील सेवा जेष्ठता एका बाजूने विचारात घेतली जाईल तर दुसऱ्या बाजूने आ. मोनिका यांचे राजकीय वजन 'कृष्णा' यांच्यासाठी निर्णायक ठरणार आहे.

ॲड प्रताप ढाकणे यांच्याशिवाय आ. राजळे यांना प्रबळ राजकीय विरोधक नाही असे चित्र तालुक्यामध्ये रंगवले जात असले तरी हे अर्धसत्य आहे. भाजपामध्ये सध्यापक्षीय धोरणावर बोलणाऱ्यांपेक्षा नेत्यांच्या सुरुवात सूर मिसळून पुढे चालण्याची स्पर्धा लागली आहे. तालुका खरेदी विक्री संघ, दूध संघ, बाजार समिती, नगरपालिका, वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना अशा सर्वच ठिकाणी आ. राजळे यांचा प्रभाव आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या राजकारणामध्ये कृष्णा राजळे यांची एन्ट्री करण्यासाठी चा आखाडा तयार करण्याचे काम सुरू झाल्याने या व्यासपीठाचा वापर प्रसंगी विधानसभेसाठी सुद्धा होऊ शकतो असे चित्र आगामी काळात तयार होऊ शकते.

राजकीय दृष्ट्या सध्या शेवगाव पाथर्डी मतदार संघात सर्वाधिक प्रभावी नेतृत्व म्हणून राजांच्या नेतृत्वाकडे बघितले जाते याचे मुख्य कारण शेवगाव तालुक्यातील मा.आ.घुले बंधू पाथर्डी तालुक्यातील प्रताप ढाकणे हे नेते सत्तेच्या बाहेर आहेत. सत्ता कारणांमध्ये सहभागी नसल्याने नेत्यांभोवती कार्यकर्त्यांचे प्रभावी वलय नाही. प्रताप ढाकणे यांचा संभाव्य भाजप प्रवेश स्थानिक पातळीवरच रोखला गेल्याने आता या प्रक्रियेला गती येऊ शकेल. कृष्णा राजळे यांची पक्ष संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्याला ओळख करून देण्यासाठीचा धोरणात्मक कार्यक्रम गेल्या सहा महिन्यांपासून अत्यंत नियोजनबद्ध रीतीने सुरू झाला असून विशेष यंत्रणा काम करत आहे. जिल्ह्याच्या राजकारणात नातेगोते यांचा विचार करता जिल्हा परिषदेमध्ये नव्या गटाची बांधणी कृष्णा राजळे यांच्या माध्यमातून करण्यासाठीचे नवीन पाऊल यशस्वी व्हावे म्हणून राजळे समर्थक कार्यकर्ते उत्साही पणे कामाला लागले आहेत.

## बेलवंडीत शैक्षणिक साहित्याचे वाटप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** विद्यार्थ्यांनी आता लहर वापर केला पाहिजे. बायो टेक्नॉलॉजीचा अभ्यास केला पाहिजे आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आपले भवितव्य घडविले पाहिजे असे प्रतिपादन परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतापसिंह पाचपुते यांनी बेलवंडी येथे होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात बोलताना केले. राघव फाउंडेशन बेलवंडी आणि प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. गणेश विजय मैड यांच्या विशेष सहकार्याने परिसरातील १५० होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी पाचपुते बोलत होते. भैरवनाथ मंदिर परिसरात हा स्तुत्य सोहळा उत्साहात पार पडला. आगामी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना दर्जे दार साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या कार्यक्रमात गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांची स्कूल बॅग, वह्या, कंपास पेटी, चित्रकला वही, पेन्सिल व पेन पॅक, तसेच कलर पेटी अशा सर्व सोयींनी युक्त असलेल्या शालेय किटचे वाटप करण्यात आले. यावेळी परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रतापसिंह पाचपुते,बेलवंडी गावचे सरपंच ऋषिकेश शेलार आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक डॉक्टर रणजीत गुरव, हृदयरोग तज्ञ डॉ. गणेश मैड, स्वाती मैड, , उद्योजक चेतन शर्मा, राघव फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर जाधव, आणि सचिव डॉ. अयोध्या मनोहर जाधव, संचालक सावता हिरवे, प्राचार्य राजेंद्र खेडकर, सुनील ढवळे, असुरुदिन हावलदार, डॉ. विजय मैड, नानाभाऊ हिरवे, शरद इथापे, विठ्ठल लोखंडे, निखिल क्षीरसागर, मधुकर पवार, ह.भ.प. संभाजी महाराज दरोडे, प्राध्यापक अंकुश बनकर, एडव्होकेट हनुमंत गाजरे, निकिता शर्मा, अश्विनी जाधव, संतोष शेलार, निलेश पवार, कुमार गुरव, प्रकाश जाधव, दीपक धनवडे आदींसह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संयुक्त सामाजिक उपक्रमाचे बेलवंडी व परिसरातील नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे.

## अमोल राळेभात यांची निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** शिक्षण क्षेत्रातील आशिया खंडातील सर्वात मोठी नामांकित संस्था असलेल्या 'रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग, अहिल्यानगर अंतर्गत येणाऱ्या कन्या विद्यालय, जामखेड येथील स्कूल कमिटी सदस्य म्हणून जामखेडचे सुपुत्र अमोल जगन्नाथ राळेभात यांची निवड करण्यात आली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या वतीने नुकतेच त्यांना याबाबतचे अधिकृत पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

अमोल राळेभात यांची ही निवड तीन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे जामखेड तालुक्यासह संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रयत शिक्षण संस्थेच्या वतीने विभागीय अधिकाऱ्यांनी अमोल राळेभात यांचे हार्दिक अभिनंदन केले असून, त्यांच्या कार्यकाळात कन्या विद्यालय, जामखेड या शाखेच्या सर्वांगीण आणि गुणात्मक विकासासाठी त्यांचे बहुमोल योगदान लाभेल, असा विश्वास पत्राद्वारे व्यक्त केला आहे. अमोल राळेभात हे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही कार्यरत असून, आता रयत शिक्षण संस्थेसारख्या पवित्र आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या संस्थेमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळाल्याने शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातून आनंद व्यक्त होत आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व मित्रपरिवार, राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून भरभरून कौतुक व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



## काकडे विद्यालयात नव्या शिलेदारांचे उत्स्फूर्त स्वागत!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** दीर्घ सुट्ट्यांनंतर शाळांची घंटा वाजली असून, स्थानिक आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवीच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे अत्यंत उत्साही आणि ढोल-ताशांच्या गजरात दिमाखात स्वागत करण्यात आले. पहिल्याच दिवशी शाळेचे रूपांतर एका सोहळ्यात झाल्याने चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.

उत्साही आणि आनंदी वातावरणात मिरवणूक शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर व्हावी आणि त्यांच्यात शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी विद्यालयाच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले होते. ढोल-ताशां तोफांच्या कडकडाटात आणि उत्स्फूर्त घोषणांच्या गजरात नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. एका आनंदमयी आणि उत्साही वातावरणामध्ये विद्यार्थ्यांची मिरवणूक काढून त्यांना शाळेच्या परिसरात आणण्यात आले. या अभूतपूर्व स्वागताने विद्यार्थी भारावून गेले होते. फुगे, रंगीबेरंगी तोरणे आणि स्वागताच्या फलकांनी वर्ग खोल्या नटल्या होत्या. यामुळे विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शाळेबद्दल आपुलकी निर्माण झाली. मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन या दिमाखदार स्वागत सोहळ्याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव बेटा, उपमुख्याध्यापक अनिल मगर, पर्यवेक्षक लक्ष्मणराव गाडे, सुनील आव्हाड आणि मोहिनीताई बडदे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थी हेच शाळेचे खरे वैभव आहेत. पहिल्या दिवशी मुलांच्या चेहऱ्यावरील हा आनंद वर्षभर असाच टिकवून ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहील.

## वराळ यांच्या स्मरणार्थ मुलिका देवी विद्यालयाला 'वॉटर फिल्टर'

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** मुंबई येथील व्यवसायीक राजू नाना वराळ पाटील यांच्या स्मरणार्थ संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व वराळ कुटुंबाकडून दिड लाख रुपये किमतीचा तसेच एक हजार लिटर पाणी क्षमतेचा वॉटर फिल्टर भेट देण्यात आला. राजू नाना वराळ हे या विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत तसेच शाळा विकासासाठी वराळ कुटुंबाचे मोठे योगदान आहे. निघोज आणी परिसरात शैक्षणिक संस्कृतीला चालना मिळण्यासाठी माजी सरपंच व गावचे सर्वेसर्वा किसनराव वराळ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना विनंती करुन या ठिकाणी मुलिका देवी विद्यालय सुरू केले. गेली वीस वर्षांपूर्वी दहावीचे शिक्षण घेणारा विद्यार्थी व्यवसाय तसेच रोजगाराच्या माध्यमातून शिक्षण अर्धवट सोडत होता. शैक्षणिक पद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. आपले मुले राज्य व केंद्र सरकारच्या सेवेत उच्च अधिकारी व्हावेत ही पालकांची मानसिकता असल्याने निघोज आणी परिसरातील शेकडो विद्यार्थी उद्योजक, उद्योगपती, उच्च अधिकारी म्हणून आज कार्यरत आहेत याचे सर्वस्वी सर्व श्रेय मुलिका देवी विद्यालय व महाविद्यालयाला जात आहे. विद्यालयाच्या प्राचार्या मनिषा गाडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, माउली वरखडे, भास्करराव वराळ, बजरंग वराळ, आप्पासाहेब वराळ, दौलतराव सुपेकर, अस्लम इनामदार, रामचंद्र सुपेकर, राहुल वराळ, रवि लंके, बबनराव सोनवणे, किसनराव घोगरे, मंगेश वराळ, निर्मला सोबले, जयवंत पुजारी, काळे, औटी, खोसे, आवारी, इनामदार, खिलारी, खोडदे उपस्थित होते.

## केव्हीके मधील कृषी निविष्ठा परवानाधारक विक्रेता प्रशिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था संचलित कृषि विज्ञान केंद्र, दहीगाव आणि कॉमन सर्विस सेंटर, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सचिवांसाठी खते, बियाणे, कीटकनाशके व कृषी निविष्ठा परवानाधारक विक्रेता प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक १ ते १५ जून २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला.

या प्रशिक्षणामध्ये अकोले, कोपरगाव, नेवासा, पाथर्डी, राहुरी, संगमनेर, शेवगाव व राहाता तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे सचिव व ३० प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी कॉमन सर्विस सेंटर, महाराष्ट्र चे असिफ पठाण, राहुल काळे हजर होते. हा कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी कॉमन सर्विस सेंटर चे उपाध्यक्ष श्री.रस्तोगी देवेंद्र यांचा मोलाचा वाट होता.

प्रशिक्षणामध्ये मृदाशास्त्र, खतटंचाईमुळे युरिया व डीएपी यांची कमतरता भासत असून त्यास पर्याय म्हणून मिश्र व संयुक्त खताचा वापर व एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, नैसर्गिक शेती, बियाणे तंत्रज्ञान, पीक उत्पादन तंत्रज्ञान, कीड व रोग ओळख, तण व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, सुरक्षित कीटकनाशक वापर, कृषी निविष्ठा विक्रीसंबंधी कायदे व नियम, कृषी व्यवसाय व्यवस्थापन तसेच खतांची टंचाई लक्षात घेऊन, ग्राहक सेवा कौशल्ये यांसारख्या विविध विषयांवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. त्याचसोबत एल निनोचा प्रभाव बाबतीत मार्गदर्शन, प्रात्यक्षिके, गटचर्चा, नैसर्गिक शेतीचे प्रात्यक्षिक, क्षेत्र भेटी, आणि अध्ययन सहलींच्या माध्यमातून सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पानंद रस्त्याच्या दुरुस्तीची ग्रामस्थांची तहसीलदारांकडे मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** तालुक्यातील प्रभूवाडगाव ते दहिगाव शे. या दोन गावांना जोडणाऱ्या जुन्या पानंद रस्त्याचे तातडीने मुरमीकरण व खडीकरण करण्यात यावे अशी मागणी शिवसेना नेत्या तथा मा.जि.प.सदस्या सौ.हर्षदा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभूवाडगाव येथील ग्रामस्थांनी नायब तहसीलदार संजय गायकवाड यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, प्रभूवाडगाव ते दहिगाव शे. दरम्यानचा सुमारे दोन किलोमीटर लांबीचा पानंद रस्ता अनेक वर्षांपासून शेतकरी, नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वापरात आहे. महसूल नकाशावर अस्तित्वात असलेला हा रस्ता शेतजमिनीमधून जात असून सध्या कच्च्या स्वरूपात आहे.

या रस्त्याचा उपयोग शेतकऱ्यांना शेती मशागत, पेरणी, कापणी, शेतमाल वाहतूक तसेच जनावरांच्या चाऱ्याची ने-आण यासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच दोन्ही गावांमधील दळणवळणासाठी हा महत्त्वाचा मार्ग असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले आहे.



मात्र रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने आणि पावसाळ्यात चिखल साचत असल्याने नागरिकांना व शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकवेळा वाहनांची वाहतूकही ठप्प होत असून शेतमाल व इतर आवश्यक वस्तूंच्या वाहतुकीत अडथळे निर्माण होत असल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

यामुळे संबंधित रस्त्याची तातडीने पाहणी करून मुरमीकरण व खडीकरणासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून द्यावा, अशी तहसीलदारांकडेकाकडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर ग्रा.प.सदस्य मंदाबाई अंगरखे, अल्का बटूळे, मनिषा दराडे, अरुणा बटूळे, कासुबाई दराडे, मथुरा केदार, अनिता केदार, उषा अंगरखे, शोभा खेडकर, आशा जायभाये, कासुबाई खेडकर, भगवान खेडकर, वासुदेव बटूळे, देविदास दराडे, अशोक दराडे, भगवान बटूळे, राजु अंगरखे, भागवत बटूळे, भागवत बारगजे, शहादेव बटूळे, शरद दराडे, बाळासाहेब बारगजे उपस्थित होते.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.१७ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## महिलेवर अत्याचार व चाकू हल्ल्या प्रकरणी आरोपीला ५ वर्षांची शिक्षा

शनिशिंगणापूर : जागरण-गोंधळाच्या कार्यक्रमाच्या बहाण्याने एका २८ वर्षीय पीडित महिलेवर अत्याचार करून चाकूने वार केल्याप्रकरणी आरोपी बाबासाहेब किसन क्षीरसागर (वय -४५, मूळ रा.राहाटणी फाटा ता. हवेली जि.पुणे (सध्या रा. धामणगाव, ता. जामखेड) याला नेवासा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने आयपीसी कलम ३०७ अंतर्गत दोषी ठरवत ५ वर्षे सश्रम कारावास व १०० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. ही घटना २४ जून २०२४ रोजी फत्तेपूर ता.नेवासा परिसरात घडला होता. पीडितेवर अत्याचार करून आरोपीने तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लुटले व जीवे मारण्याची धमकी दिली होती. शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक खगेन्द्र टेंभेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता विष्णुदास के. भोर्डे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. उपलब्ध पुरावे व साक्षीदारांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून शिक्षा सुनावली.याप्रकरणी त्यांना महिला पोलीस कर्मचारी स्वाती तडुलकर यांनी न्यायालयात मोलाचे सहकार्य केले.

# रयत ही केवळ शैक्षणिक संस्था नसून सामाजिक परिवर्तनाची एक चळवळ : आ. रोहित पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी आणि संत गाडगेबाबा यांच्या पुरोगामी विचारांचा वसा आणि वारसा जपणारी एकमेव रयत शिक्षण संस्था आहे.असे प्रतिपादन कर्जत -जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी मत व्यक्त केले. श्रीरामपूर येथे रयत शैक्षणिक संकुलात आयोजित सत्कारप्रसंगी सहविचार सभेत रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग तसेच, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर निमंत्रित सदस्यपदी निवड झाल्याबद्दल सत्कारमूर्ती याप्रसंगी आमदार पवार बोलत होते.

यावेळी,अध्यक्षस्थानी मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा व प्रमुख, रयत शैक्षणिक संकुल सदस्य मिनाताई जगधने,रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य संदिप वर्पे




रयत शैक्षणिक संकुलाच्या वतीने आयोजित केलेल्या रा.बा.नारायणराव बोरावके महाविद्यालयात सत्कार समारंभ व सहविचार सभेत मार्गदर्शन करताना आमदार रोहित पवार,मीनाताई जगधने यांच्यासह आदी मान्यवर...

आदीसह मान्यवर उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी, आमदार पवार म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्याग, समर्पण आणि समाज परिवर्तनाच्या ध्येयातून ही संस्था उभी राहिली आहे.

या महामानवांचा विचार आणि कर्मवीरांचे कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपण सर्वांनी स्वीकारली पाहिजेत, या कामासाठी संघर्ष आणि अपार कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजेत. ज्यावेळी आपण समाजात चांगले काम करतो अशा वेळी चांगल्या कामाला समाज नेहमी धावून येत असतो. रयत शिक्षण संस्था ही केवळ शैक्षणिक संस्था नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहेत.

रोहित दादा पवार यांच्या मानपत्रावर आधारित डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली.या मानपत्राचे लेखन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.निरंजन फरांदे यांनी केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयुष्य वेचले. त्यांच्या या कार्याला आजच्या काळात अधिक व्यापक स्वरूप देत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक भान आणि परिवर्तनवादी विचारांची जोड देणे आवश्यक आहे. तसेच बदलत्या काळाचे पावले ओळखून आपल्याला नव तरूण पिढीला शिक्षण द्यावयाचे आहे. या नवीन आधुनिक तंत्रज्ञानाविषयक शिक्षणाबाबत कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही.यासाठी रयत सेवकांनी नेहमी सतर्क राहून काम केले पाहिजे. शिक्षणक्षेत्रात काम करताना विद्यार्थी हित जोपासायचे असते. सोशल मिडीयाचा देखील वापर विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित करण्यासाठी शिक्षकांनी करावा. आधुनिक शिक्षणाचे धडे मिळण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने काळाची पावले ओळखून कृत्रिम बुद्धिमत्तेचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यास सुरुवात केली आहेत.

संस्था विद्यार्थी हा प्रमुख घटक मानून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी काम करत आहे.असे पवार म्हणाले. यावेळी बोलताना मीनाताई जगधने यांनी रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली.त्यासाठी चांगले काम करणाऱ्या व्यक्ती-संस्थांना आवर्जून भेटी दिल्या पाहिजेत.तेथील चांगल्या गोष्टी आपल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात राबवण्यासाठी शिक्षकांनी नेहमीच प्रयत्नशील राहिले पाहिजे, यात कार्यक्रमाप्रसंगी बाबासाहेब भोस, सुरेश बोळीज, राजेंद्र चांदे, यांची रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडीचे सदस्य, प्रकाश निकम पाटील,बापूसाहेब पटारे, रावसाहेब म्हस्के पाटील, डॉ.राजीव शिंदे,डॉ. रविंद्र जगधने, नगरसेवक राजेंद्र पवार, नवनाथ बोडखे, काकासाहेब वाळुंजकर, प्रमोद तोरणे, प्राचार्य डॉ.संजय नगरकर, प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे,मुख्याध्यापक सुनील साळवे, सोनाली पैठणे तसेच जनरल बॉडीचे इतर सदस्य लाईफ मेंबर, लाइफ वर्कर, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, सर्व शाखाप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रवीण बडधे यांनी करून दिला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार प्राचार्य डॉ. संजय काबळे यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. योगिता रांधवणे आणि प्रा.योगिता बागुल यांनी केले.

## अवैध माती वाहतुकीवर दुसऱ्या दिवशीही कारवाई; दोन हायवा जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील म्हैसगाव परिसरात सुरू असलेल्या अवैध माती वाहतुकीविरोधात महसूल विभागाने पुन्हा एकदा धडक कारवाई करत माती वाहतूक करणारी आणखी एक हायवा गाडी पकडला आहेत.जप्त करण्यात आलेल्या गाडी पुढील कार्यवाहीसाठी राहुरी येथे जमा करण्यात आली असल्याची माहिती मिळाली. म्हैसगाव (ता. राहुरी) या परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन व वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या.

याबाबत स्थानिक नागरिक तसेच शेतकऱ्यांकडून वारंवार आक्षेप नोंदविण्यात येत होते. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने कारवाईची मोहीम सुरू केली असून सलग दुसऱ्या दिवशीही अवैध माती वाहतुकीवर कारवाई करण्यात आली आहे. माहितीनुसार, मंगळवारी म्हैसगाव आठवडे बाजार असल्यामुळे त्या ठिकाणी मोजणी असल्यामुळे बाजार स्थलांतर झाला होता. त्यानंतर परिसरात मोजणीचे काम सुरू असताना तलसीलदार अमित पवार ग्राममहसूल अधिकारी व तलाठी बाबासाहेब पंडीत यांनी परिसराची पाहणी करत होते.

यावेळी माती भरून जात असलेली हायवा गाडी त्यांच्या निदर्शनास आली. संबंधित वाहनाची चौकशी केली असता आवश्यक कागदपत्रांबाबत समाधानकारक माहिती न मिळाल्याने वाहन ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर ही गाडी राहुरी येथे जमा करण्यात आली. विशेष म्हणजे, सोमवारीदेखील महसूल विभागाने अशाच प्रकारची एक हायवा गाडी पकडून कारवाई केली होती. त्यामुळे अवघ्या दोन दिवसांत दोन हायवा वाहनांवर कारवाई झाल्याने अवैध माती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## विनयभंग प्रकरणातील आरोपीला नेवासा पोलिसांकडून तात्काळ अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील एका मुलीचा विनयभंग करून फरार झालेल्या आरोपीस नेवासा पोलिसांनी तत्पर कारवाई करत अटक केली. शिवाजी संताराम सावंत (वय ४०, रा. सुरेशनगर, ता. नेवासा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ जून रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास पीडित मुलगी आठवडा बाजारासाठी जात असताना बाजारतळ परिसरात आरोपीने तिला अडविले.



दर्शनासाठी पैसे मागण्याच्या बहाण्याने तिचा हात पकडून अश्लील वक्तव्य करत लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ७४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दरम्यान, आरोपीकडून अशाच प्रकारे त्रास झालेल्या अन्य व्यक्तींनी नेवासा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## श्रीगोंदा गुटखा प्रकरण तापले

### तत्कालीन पोलीस निरीक्षकांसह कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आलेला गुटख्याचा मुद्देमाल पुन्हा बाजारात विक्रीसाठी आल्याचा गंभीर आरोप करत तत्कालीन पोलीस निरीक्षक किरण शिंदे व संबंधित कर्मचाऱ्यांवर चोरीचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी स्वराज्य जनजागृती परिषद, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते टिळक भोस यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे केली आहे. भोस यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या अर्जात म्हटले आहे की, श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक सीआर ४६३/२०२६ अंतर्गत १५ मे २०२६ रोजी दाखल झालेल्या प्रकरणातील जप्त गुटखा मुद्देमाल पुन्हा बाजारात आढळून आल्याने संपूर्ण प्रकार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

यामुळे पोलीस विभागाची प्रतिमा मलिन झाली असून जनतेचा विश्वास डळमळीत झाला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १५ मे रोजी बेलवंडी पोलिसांनी श्रीगोंदा हद्दीत छापा टाकून सुमारे ४ लाख ६० हजार रुपयांचा गुटखा जप्त केला होता.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, १४ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेने श्रीगोंद्यात केलेल्या कारवाईत जप्त केलेल्या गुटख्यावर ४६३/२६ असा स्पष्ट उल्लेख आढळून आल्याने याच मुद्देमालाचा पुन्हा वापर झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. भोस यांनी अर्जात नमूद केले आहे की, गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांची असते.

असे असताना जप्त माल पुन्हा बाजारात सापडणे ही अत्यंत गंभीर आणि संशयास्पद बाब आहे. त्यामुळे या प्रकरणात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताची शक्यता नाकारता येत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. याप्रकरणी विभागीय चौकशी करून दोषी अधिकारी, मुद्देमाल शाखेतील कर्मचारी व जबाबदार व्यक्तींवर निलंबनासह फौजदारी कारवाई करावी, तसेच चोरी, मुद्देमालाचा अपहार आणि तस्करीस मदत केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी अर्जातून करण्यात आली आहे. भोस यांनी याआधी अहिल्यानगर पोलीस अधीक्षक कार्यालयातील कथित ड्रग्ज प्रकरणाचाही उल्लेख करत, जप्त मुद्देमालाच्या गैरव्यवहाराच्या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली आहे.

संबंधित दोषींवर कारवाई न झाल्यास २६ जूनपासून मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. दरम्यान, या आरोपांमुळे श्रीगोंद्यातील गुटखा प्रकरण अधिकच चर्चेत आले असून, या प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकारी कोणती भूमिका घेतात आणि चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## कर्मवीर शंकरराव काळे कारखाना मिल रोलर पूजन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या २०२६-२७ च्या ७२ व्या गळीत हंगामाची तयारी करण्याच्या दृष्टीने मिल रोलर पूजन कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे व कारखान्याचे चेअरमन आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे संचालक सचिन चांदगुडे यांच्या हस्ते मंगळवार (दि.१६) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. मिल रोलर पूजनाने कारखान्याच्या ७२ व्या गळीत हंगामाची तयारी सुरु झालेली आहे. येणाऱ्या गळीत हंगामाची पूर्व तयारी म्हणून दरवर्षी करण्यात येणारे मिल रोलर पूजन संपन्न झाले असून संपूर्ण कारखान्याचे नूतनीकरणाचे काम मागील वर्षी पूर्ण झालेले आहेत.

त्यामुळे अडचणी बहुतांश प्रमाणात कमी झाल्या आहेत. तरी देखील दरवर्षी प्रमाणे कारखान्याच्या यंत्र सामुग्रीचे देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मिल रोलर पूजनाने कारखाना सुरु होण्याचा संदेश मिळतो.त्यामुळे छोट्या मोठ्या व्यावसायिकांमध्ये आनंदाचे आणि




कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या मिल रोलर पूजनप्रसंगी कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे, व्हा.चेअरमन प्रवीण शिंदे, संचालक मंडळ व पदाधिकारी.

उत्साहाचे वातावरण निर्माण होवून अर्थकारणाला गती मिळण्याचा हा एक प्रकारचा संदेश असल्यामुळे कारखान्याच्या मिल रोलर पूजनाला विशेष महत्व आहे. तसेच गळीत हंगामाच्या दृष्टीने ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा भरती ॲडव्हान्स वाटप सुरु करण्यात आले असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले आहे.

चालू वर्षी मान्सूनवर एलनिनोचे सावट असल्यामुळे अर्धा जून महिना होवूनही पावसाचा कुठेही मागमूस नसल्यामुळे पेरण्या खोळंबल्या आहेत. संभाव्य पाणी टंचाई ओळखून शिल्लक पाण्याचा काटेकोरपणे वापर करण्यासाठी सुरु असलेल्या सिंचनाच्या आवर्तनाला स्थगिती देण्यात आली असून ऊस शेती धोक्यात आली आहे. जरी काहीशी चिंताजनक परिस्थिती असली तरी शेतकऱ्यांनी सिंचनासाठी पाणी जपून वापरावे.दुष्काळी परिस्थिती पाहता शेतकऱ्यांनी अवाढव्य खर्च करू नये व पुरेसा पाऊस पडल्याशिवाय पेरण्या करू नये. शासनाकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले आहे.

याप्रसंगी कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे, संचालक दिलीपराव बोरनारे, सूर्यभान कोळपे, सुधाकर रोहोम, राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, श्रीराम राजेभोसले, राहुल रोहमारे, शंकरराव चव्हाण, अनिल कदम, अशोक मवाळ, सुनील मांजरे, प्रशांत घुले, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे,डॉ.मच्छिंद्र बर्डे, दिनार कुदळे, श्रावण आसने, गंगाधर औताडे, सुरेश जाधव, विष्णू शिंदे, कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, असि. सेक्रेटरी संदीप शिरसाठ, चीफ इंजिनिअर निवृत्ती गांगुर्डे, चीफ केमिस्ट सुर्यकांत ताकवणे तसेच विविध खात्यांचे प्रमुख पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## तहसीलदारांच्या दालनात शेतकरी कर्मचाऱ्यांमध्ये तुफान राडा

### व्हिडिओ काढण्यावरून धक्काबुक्की

**दिपक बरकसे | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील रस्त्याच्या सुनावणी साठी सकाळी ११ वाजेपासून तहसीलदारांच्या दालनात ठिय्या मांडून बसलेल्या शेतकरी आणि कर्मचारी यांच्यात वैजापूर तहसीलदारांच्या दालनात मंगळवारी तुफान राडा झाल्याची घटना समोर आली आहे... व्हिडिओ काढण्यावरून हा राडा झाला असून शेतकरी आणि कर्मचारी यांच्यात धक्काबुक्की झाल्याची घटना घडली आहे. व्हिडिओ काढण्यावरून कर्मचाऱ्याने शेतकऱ्याची गच्ची पकडल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे तर दालनात शेतकरी व्हिडिओ काढत असल्याने कर्मचाऱ्याने मोबाईल हिसकावल्याने हा प्रकार घडला या प्रकरणात कर्मचाऱ्याला समज देण्यात आली असल्याची माहिती नायब तहसीलदार कुमावत यांनी दिली आहे. दरम्यान रस्त्याच्या प्रकरणात शेतकऱ्यांचे लेखी म्हणणे घेतले असून यांबाबत स्थळ पाहणीचे आदेशही देण्यात आले असल्याची माहिती नायब तहसिदलार कुमावत यांनी दिली आहे तर शेतकऱ्यांनी आज सुनावणी असताना तहसीलदार कार्यालयात नव्हते त्यामुळे आम्ही त्यांची वाट पाहत दालनात बसलो दुपारी १२ ते चार बसूनही तहसीलदार न आल्याने आम्ही व्हिडिओ काढायला सुरूवात केली मात्र सदरील कर्मचाऱ्याने व्हिडिओ काढताना अचानक येऊन गच्ची पकडून मोबाईल हिसकावला असा आरोप शेतकऱ्याने केला असून कर्मचाऱ्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई करा अशी मागणी केली आहे.

### नेमके काय आहे प्रकरण ?

गेल्या तीन वर्षापासून तलवाडा येथील शिव रस्ता मोकळा व्हावा म्हणून गोकुळ भानुदास मगर यांच्यासह अन्य ३० शेतकऱ्याकडून शिव रस्त्या मोकळा करण्या संदर्भात पाठपुरवठा



सुरू होता,दरम्यान काही दिवसा पूर्वीच या प्रकरणात मामलतदार कोर्टात प्रकरण दाखल करण्यात आले होते या प्रकरणाची मंगळवारी दुपारी बारा वाजता सुनावणी होती. या प्रकरणाच्या पहिल्या सुनावणीत लेखी म्हणणे मागवण्यात आले होते. मात्र गोकुळ नगर यांच्यासह आलेले शेतकरी यांना तहसीलदार दालनात न भेटल्याने त्यांनी सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी चार वाजेपर्यंत वाट बघितली मात्र तहसीलदार न आल्याने यातील एका शेतकऱ्याने दालनात व्हिडिओ शूटिंग सुरू केली जालना बाहेर असलेल्या कर्मचाऱ्याने व्हिडिओ काढू नका असे म्हणत मोबाईल हिचकावला आणि त्यानंतर हा सर्व राडा सुरू झाला.

### शेतकऱ्यांचे समाधान न झाल्याने ठिय्या सुरूच

या घटनेनंतर नायब तहसीलदार कुमावत यांनी शेतकऱ्यांची भेट घेतली दरम्यान त्यांनी आजच्या तारखेत लेखी म्हणणे घेतलेले असून त्या अनुषंगाने स्थळपहनीचे पत्रही काढले असल्याचे शेतकऱ्यांना सांगितले.पत्राची प्रतही शेतकऱ्यांनी दिली मात्र शेतकऱ्यांनी यगोदर अनेकदा स्थळ पाहण्या झाला मात्र रस्ता मोकळा झाला नाही आम्हाला रस्ता मोकळा करून द्या मगच आम्ही हलू अशी भूमिका घेतली.

### तहसीलदारांनी शेतकऱ्यांची काढली समजूत

तसीलदार सुनील सावंत यांनी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास तहसील कार्यालयात शेतकऱ्यांनी भेट घेऊन चर्चा केली.दरम्यान सावंत यांनी सदरील प्रकरण हे नुकतेच दाखल झाले असून त्याची आज पहिलीच तारीख असल्याने या अर्धन्यायिक प्रक्रियेत दोन्ही बाजूचे म्हणणे घेऊन कायदेशीर प्रक्रियेनेच मार्ग काढावा लागेल असे सांगितले.यासोबतच शेतकऱ्यांना घटनास्थळी स्वतः येऊन पाहणी करणार असे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी तात्पुरते समाधान मानले.

## करपे इस्टेटमध्ये घरफोडी

### १४.५० लाखांचे दागिने व रोकड लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील करपे इस्टेट परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोकड असा तब्बल १४ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी रितेश भरत लांबे (वय ३२, व्यवसाय-शेती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ९ जून ते १२ जून २०२६ दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या राहत्या घरात प्रवेश करून बेडरूममधील कपाट फोडले. कपाटात ठेवलेले सुमारे १९ तोळे सोन्याचे दागिने आणि ५० हजार रुपयांची रोख रक्कम चोरट्यांनी चोरून नेली.

घटना निदर्शनास येताच लांबे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ तपास करीत आहेत. आरोपींचा माग काढण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरू असून तांत्रिक व भौतिक पुरावेही गोळा करण्यात येत आहेत. या घरफोडीमुळे परिसरात नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.